# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★ LIBRARY ★
5|8|05

१ • संपादकीय
३ • लोकशाही: ख्रिश्चन धर्म व इस्लाम
७ • मुस्लिम स्त्रिया: मोकळ्या श्वासाकडे
११ • आम्हालाही आवाज आहे...!
१३ • दक्षिण आशिया: औद्योगिक जगतात दहशतवाद
१७ • शायनिंग चीन (?) व भारतातील विषमता
२१ • अमेरिकेतील बुश सरकार आणि शास्त्रज्ञ
२४ • विज्ञानसंस्थांची कामगिरी व भारत
२७ • नैसर्गिक संसाधने, भूविज्ञान व रोजगार
२९ • शांततेच्या पाऊलखुणा ('शॉपिंग मॉल'मधील उपक्रम)
३२ • जगाच्या पाठीवर....(विज्ञान)
३४ • कालप्रवाहात......

खंड ३ : अंक ५ ऑगस्ट २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**
व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ३ (अंक ५) ऑगस्ट २००४**
**संपादक - रमेश पानसे**
**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले** जाते. ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

या अंकात काही वैशिष्ट्यपूर्ण लेख वाचकांना वाचायला मिळतील. या लेखांमधून जगात अलीकडे घडलेल्या काही घटना, जगाला वेगळ्याच दिशेने घेऊन जात आहेत, असे लक्षात येईल. उदाहरणार्थ, पहिल्याच लेखात ख्रिश्चन धर्मांतर्गत काही विचारपरिवर्तन घडले असल्याचा दाखला मिळेल. धर्म, व्यक्तिस्वातंत्र्याला उचलून धरतो, आणि या व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेवर आधारित लोकशाही राज्यव्यवस्थेला पाठिंबा देतो. ही घटना, पुढील काळातील लोकशाहीच्या विस्ताराला उपयुक्त ठरणारी आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच स्त्री-स्वातंत्र्याचा आग्रह, सर्वच लोकशाही राष्ट्रे धरीत आहेत. परंतु मध्यपूर्वेतील मुस्लिम राष्ट्रांमध्ये या दिशेने काही घडू पाहत आहे, ही बातमी, या अंकातील दुसऱ्या लेखाने दिली आहे. मुस्लिम धर्माच्या संदर्भात, आधुनिकतेच्या अंगाने काही घडत असेल तर ती नेहमीच, तिच्याकडे उत्सुकतेने नि आशेने पाहावे अशी बातमी ठरत असते. तिसऱ्या लेखात दिलेला, वीस इस्लामिक राष्ट्रांतील महिलांच्या, जर्मनीतील अधिवेशनाचा वृत्तांत याचे प्रत्यंतर आणून देईल.

इराक आणि जगावरच अकारण युद्ध लादणारे अमेरिकेचे बुश सरकार हे आपल्या राजकीय अस्तित्वासाठी देशातील शास्त्रज्ञांचाही उपमर्द कसा करतात, याची माहिती पुढे येऊन त्यावर अमेरिकेत वाद माजत आहेत.

विविध प्रकारच्या संशोधनांमुळे आज मानवी समाज समृद्ध होत आहे. असे संशोधन करण्यात पश्चिमेकडील संस्थाच आघाडीवर आहेत. यात भारताचे स्थान कुठे आहे, याबद्दलचे काही विचार 'विज्ञानसंस्थांची कामगिरी' या लेखातून आपल्यापुढे आले आहेत.

'अर्थबोधपत्रिके'ने, अलीकडच्या काळात, 'शांततेच्या पाऊलखुणा' हे सदर चालविले असून, त्यांमधून जगाच्या कानाकोपऱ्यांत चाललेले, जागतिक शांतता निर्माण व्हावी यासाठीचे प्रयत्न, वाचकांपुढे आणण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

युद्धे, हिंसा आणि भ्रष्ट राजकारण यांच्या दैनंदिन उष्ण अनुभवांवर 'शांततेच्या पाऊलखुणां'चे चार शिंतोडे गारवा देणारे आणि महत्त्वाचे ठरतात. माणसाच्या भवितव्याबद्दल आशेचे काही किरण टाकले जातात.

वाचकांनी आपल्या अभ्यासपूर्ण प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात. ■■

## वाचकांचा प्रतिसाद

अर्थबोधपत्रिका खूपच वाचनीय आहे, ज्ञानात भर घालणारी आहे. त्यामुळे प्रत्येक मराठी माणसाने आजूबाजूंच्या घडामोडी नेमकेपणाने व व्यवस्थित समजून घेण्यासाठी ही पत्रिका वाचायला हवी. ही पत्रिका नियमित वाचण्यासाठी मी वर्गणीदार होत आहे.

*संजय घुंग्रटकर, माशेल, गोवा.*

## शिक्षणाचे विकेंद्रीकरण उपयोगी !

भारतातील 'सर्व शिक्षा अभियान', ही शासनाची योजना बरीच अडचणीत आहे. पैशाची तरतूद होते पण कामे मात्र होत नाहीत, असे इकॉनॉमिक टाइम्स (दिनांक ३० जून २००४) वरून लक्षात येते. अनेक ठिकाणी शाळाच नाहीत आणि असल्याच तर शिक्षकच नाहीत, हे चित्र काही नवे नाही. त्यामुळे २००३ -२००४ मध्ये राज्यांनी शिक्षकांच्या नेमणुका करायचे ठरविले. पण, याबाबतीत ठरविलेली उद्दिष्टे गाठण्याच्या बाबतीत राज्यांची कामगिरी समाधानकारक नाही. उदाहरणार्थ, ठरविलेले उद्दिष्ट गाठण्याच्या बाबतीत बिहारची कामगिरी शून्य टक्के झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये केवळ २१ टक्के तर उत्तरप्रदेशात २२ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली. त्यामानाने झारखंड आणि ओरिसा यांची कामगिरी खूपच चांगली आहे. झारखंडने ६९ टक्के तर ओरिसाने ७९ टक्के इतकी, शिक्षकांच्या नव्या नेमणुकांची उद्दिष्टपूर्ती केल्याचे दिसून येते.

ओरिसा -झारखंड आणि बिहार यांच्या उद्दिष्टपूर्तीमध्ये एवढी तफावत का, याचा धांडोळा घेतला तर असे लक्षात येते की, बिहारमध्ये सत्तेचे केंद्रीकरण विलक्षण तीव्र आहे. याउलट, झारखंड आणि ओरिसामध्ये शिक्षणाचे बऱ्यापैकी विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. येथे शिक्षकांची नेमणूक करण्याचे, त्यांना वेतन देण्याचे आणि वेळप्रसंगी त्यांना काढून टाकण्याचे अधिकार गावसमाजाला नि ग्रामपंचायतींना देण्यात आले आहेत. त्यामुळे एरवी ४० टक्के गैरहजेरीचे प्रमाण असणाऱ्या शिक्षकांना आता गावाकडे आणि शाळांकडे दुर्लक्ष करून चालत नाही. शिक्षकांच्या बाबतीत राज्यसरकारांनी आपल्या हाती अधिकार केंद्रित करण्याऐवजी ते गावपातळीवर देण्यामध्ये शिक्षणाचे हित आहे, असा निष्कर्ष यावरून काढायला हरकत नाही.

सामाजिक

# लोकशाही: ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम

अलीकडच्या काळात, (विसाव्या शतकात) जगाची वाटचाल लोकशाहीकडे झालेली दिसत असून, अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केला आहे किंवा काही राष्ट्रे लोकशाहीकडे जाण्याच्या मार्गावर आहेत, असे चित्र पुढे आले आहे. लोकशाहीकडे होणाऱ्या या वाटचालीत, विविध देशांमधील नागरी समाज हा देखील जागतिक, राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर पुन्हा एकदा कृतिशील झालेला दिसतो आहे. अनपेक्षित व आश्चर्यकारक बाब म्हणजे नागरी समाजाच्या या पुनरुत्थानात धर्माने (किंवा धार्मिक गटाने) महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे काही समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. 'यापुढील काळात धर्मनिरपेक्षतेचा पाया, हा महत्त्वाचा ठरणार आहे किंवा 'धर्म ही खाजगी जीवनातच राहणारी बाब ठरणार आहे,' असे म्हणणाऱ्या समाजशास्त्रज्ञांसाठी तर ही अधिकच आश्चर्याची बाब ठरली आहे.

जगाची वाटचाल, लोकशाहीकडे होण्याच्या या प्रक्रियेला 'लोकशाहीची लाट' ('थर्ड वेव्ह ऑफ डेमोक्रॅटायझेशन') असेही म्हटले गेले आहे. आणि 'लोकशाहीच्या या लाटे'साठी काही धर्मांचे, विशेषत: ख्रिश्चन धर्माचे (कॅथॉलिक) साहाय्य झाले आहे, असाही दावा काही समाजशास्त्रज्ञांनी केला आहे. त्यांनी या घटनेला 'कॅथॉलिक वेव्ह' असेही संबोधले आहे. सॅम्युअल हंटिंग्टनसारख्या राजकीय विचारवंताने तर असे म्हटले आहे की, ही लोकशाहीकडे जगाची होणारी वाटचाल एका टप्प्यावर संस्कृतींच्या मूळापाशी येऊन थांबेल व ती संस्कृतीच्या संघर्षाकडे जाऊ शकेल. त्यांच्या या 'संस्कृती संघर्षा'च्या सिद्धांतावर अनेकांनी टीकाही केली आहे. (पाहा - अर्थबोधपत्रिका, 'संस्कृतींचा संघर्ष की समन्वय', अंक १८, नोव्हेंबर २००१) मुस्लिम अतिरेक्यांनी ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर केलेल्या हल्ल्यानंतर संस्कृतींच्या संघर्षांचा विषय चर्चेत आला होता.

आता, अलीकडेच झालेल्या इराक युद्धानंतर (२००३) 'लोकशाही व धर्म' हा मुद्दा चर्चेत आला आहे. कारण, इराकमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आणि तेथे संहारक शस्त्रांचा साठा असू शकेल व तो अमेरिकेच्या विरोधातील अतिरेक्यांच्या हाती लागण्याची शक्यता लक्षात घेऊन अमेरिकेने इराकवर हल्ला केला, असे

अमेरिकेने म्हटले होते. या सर्व पार्श्वभूमीवर 'लोकशाही व धर्म' या विषयाला महत्त्व आले आहे. याच विषयावर 'प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी'मधील 'न्यू स्कूल फॉर सोशल रिसर्च' या विभागातील समाजशास्त्राचे प्रोफेसर जोस कॅसानोव्हा यांनी 'सोशल रिसर्च'मध्ये काही विचार व्यक्त केले आहेत. कॅथॉलिक धर्माने, तसेच तो मानणाऱ्या विविध देशांमधील नागरिकांनी लोकशाही रुजण्यासाठी मदत केली, तसे इस्लामबाबत घडू शकेल का, असा त्यांचा चिंतनाचा विषय आहे. लेखाच्या पहिल्या भागात त्यांनी लोकशाही चळवळीतील कॅथॉलिक चर्चचे लोकशाही व नागरी समाजाच्या संदर्भातील कार्य, यावर प्रकाश टाकला आहे; तर दुसऱ्या भागात, इस्लाम धर्म व लोकशाहीविषयक विचार यांचे विवेचन केले आहे. त्यांच्या लेखनातील काही मोजके व महत्त्वाचे मुद्दे संक्षेपात वाचकांसमोर आणले आहेत.

**धार्मिक गट व लोकशाही**

अलीकडच्या काळात, कॅथॉलिक चर्चने स्पेन, ब्राझील, पोलंड यांच्यासह अनेक देशांमध्ये लोकशाही रुजण्यासाठी मदत केली असली तरी पूर्वी मात्र कॅथॉलिक चर्चने लोकशाहीला फारसा पाठिंबा दिलेला नव्हता. काही देशांमध्ये, लोकशाही प्रस्थापित होण्याआधी हुकुमशाही अस्तित्वात होती आणि त्यावेळी कॅथॉलिक धर्मीय आणि जहाल गट देखील राजकारणात सक्रिय होते. पण कॅथॉलिक चर्चने काळानुसार बदलण्याचा प्रयत्न केला, आणि साहजिकच कॅथॉलिक देशांमध्ये लोकशाहीविषयक चळवळी फोफावल्या. म्हणजे 'लोकशाहीची तिसरी लाट' ही 'कॅथॉलिक लाट' होती, हे खरे आहे. पण महत्त्वाची बाब अशी की, लोकशाहीकडे होणाऱ्या वाटचालीबरोबर कॅथॉलिक धर्माने स्वतःमध्येही बदल घडवून आणले. आणखी एक मुद्दा असा की, लोकशाहीकडे जाणारा नागरी समाज घडविणारा आणि त्याबरोबरच स्वतःमध्ये बदल घडवून आणणारा कॅथॉलिक हा एकमेव धार्मिक गट नाही; तर इतरही काही धार्मिक गटांनी असे बदल स्वतःमध्ये घडवून आणले आहेत. उदाहरणार्थ, पूर्व जर्मनीतील लुथेरन्स, दक्षिण कोरियातील प्रॉटेस्टंट्स व कॅथॉलिक्स, दक्षिण आफ्रिकेतील एपिस्कोपालियन्स आणि इतर काही चर्चेस् तसेच रुमानिया आणि हंगेरिया येथे देखील क्रांती घडवून आणण्यात धार्मिक गटांचा काही ना काही सहभाग राहिला आहे. नागरी समाजाचे मन लोकशाहीकडे वळविण्यासाठी हे कार्य झाले आहे. (क्यूबात देखील सध्या धार्मिक स्वातंत्र्याचा व त्याअनुषंगाने लोकशाहीचा विषय चर्चच्या माध्यमांतून पुढे येतो आहे. पाहा - अर्थबोधपत्रिका, 'छळाकडून नोबेलकडे', जून २००४)

धर्म, लोकशाही आणि त्याअनुषंगाने नागरी समाजाची जडण-घडण हे विषय परस्परांशी संबंधित झाले आहेत. त्याची कारणे अशी की, धर्म व त्यानिमित्ताने चर्चसारखी स्थळे ही स्वायत्त असतात, आणि राजकीय सत्तेच्या विरोधातील नागरिकांचे सत्ताकेंद्र म्हणून ती ठामपणे उभी राहू शकतात. नागरी समाज घडविण्यात अशी सत्ताकेंद्रे मदतही करू शकतात; पण याचा अर्थ असा नव्हे की, ज्या समाजात धार्मिक गट बळकट असतात, तेथे नागरी समाजगटही तेवढाच बळकट असतो.

कॅथॉलिक धार्मिक गटाने परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याचा प्रयत्न केल्याची आणि हळूहळू नागरी समाज घडवून चर्चचे व नागरिकांचे धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राखल्याची काही उदाहरणे इतिहासात आहेत. १९३० नंतरच्या काळात, कॅथॉलिक राजवटीने फॅसिस्ट राजवटीशी जुळवून घेत चर्चसाठी काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळविले. मुसोलिनीकडून चर्चने बरेच काही पदरात पाडून घेतले. स्पेन आणि पोलंड येथेही कॅथॉलिक चर्चने राज्य सरकारबरोबर सहकार्याचे धोरण अवलंबिले होते. मग स्पेनमध्ये कॅथॉलिक प्रसारमाध्यमांना राज्य सरकारच्या नियंत्रणात न राहण्याची मोकळीक मिळाली होती. त्याचा उपयोग करूनच चर्चने, सर्वांसाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार मिळविला होता. त्यानंतरच कॅथॉलिक संघटनांनी कामगारांना एकत्र येण्याचा, विद्यापीठांच्या स्वायत्ततेचा आणि बौद्धिक स्वातंत्र्याचा मुद्दा उचलून धरला होता.

नागरी समाज घडविण्यात चर्चचा सहभाग असा हळूहळू वाढत होता. पण, चर्चने धार्मिक स्वातंत्र्याच्या पलीकडे जाऊन धार्मिक स्वातंत्र्य आणि व्यक्तीच्या सद्सदविवेक बुद्धिला अनुसरून विचार करण्याचे स्वातंत्र्य यांचा मानवाधिकार म्हणून विचार करण्यास सुरूवात केली; तेव्हा खरा 'चर्च व नागरी समाज' असा विषय जोडला गेला. यानंतर, १९६० च्या दशकात, व्हॅटिकन कौन्सिलच्या दुसऱ्या अधिवेशनात धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा यांचा, 'मानवाधिकार' म्हणून स्वीकार करण्यात आला. तेव्हा, साम्यवादाच्या विरोधात उभे राहण्यासाठी विचारस्वातंत्र्याचा व मानवाधिकारांचा एक वैचारिक हत्यार म्हणूनही उपयोग करता येईल, असेही एका गटाला वाटले होते. अशा सर्व वैचारिक मंथनानंतर आणि त्या मंथनाचा व्यवहारातील उपयोग लक्षात घेत घेत 'लोकशाही, नागरी समाज आणि धर्म' हे विषय परस्परांशी जोडले गेले.

राजकीय दृष्टीने विचारात घेण्यासारखी बाब अशी की, कॅथॉलिक धार्मिक गटांचे कार्य पुढे गेले तरी अशी एखादी 'कॅथॉलिक पार्टी' काही कोणत्या देशात उभी राहिली नाही. विसाव्या शतकाच्या अखेरीच्या दोन-तीन दशकात धर्माचे वा धार्मिक

गटांचे समाजहितासाठी सामाजिकीकरण झाले, असे म्हणता येते. ते तीन बाजूंनी झाले. एक म्हणजे, परंपरागत जीवनव्यवहारात बदल करण्याच्या बाजूने, दुसरे म्हणजे, शासन व विविध धोरणे किंवा शासन व बाजारपेठ यांच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण झाल्यास समाजहिताच्या दृष्टीने त्याची सोडवणूक करण्याच्या बाजूने आणि तिसरे म्हणजे, वैयक्तिक स्वातंत्र्य व समाजहित यांच्यात एक समतोल राहण्याच्या बाजूने. अशा घडामोडींतून कॅथॉलिक म्हणजे ख्रिश्चन डेमोक्रॅसी आता अनेक देशांमध्ये मान्य झाली आहे.


## लोकशाही आणि इस्लाम धर्म

सध्या बहुतांश मुस्लिम देशांमध्ये लोकशाही नाही ही वस्तुस्थिती आहे. पण तेथे ती कधीच स्थिरावणार नाही, असे भाकित करणे धाडसाचे ठरू शकेल. (इंडोनेशियात अलीकडेच, ५ जुलै २००४ रोजी अध्यक्षपदासाठी नागरिकांनी प्रथमच मतदान केले) कॅथॉलिक धार्मिक गटांमध्ये जशी लोकशाही व नागरी समाजाची कल्पना हळूहळू स्थिरावली, तशीच ती मुस्लिम धार्मिक गटांमध्येही स्थिरावू शकेल. सध्याचा काळ हा इस्लाम धर्मासाठी स्थित्यंतराचा ठरू शकेल. इस्लाममधील विचारवंत इस्लामबाबत नव्याने विचार करून ते घडवून आणण्याची शक्यता (काहींच्या मते कमी असली तरीही) नाकारता येत नाही. (जसे सध्या 'इस्लाम व स्त्रियांचे स्वातंत्र्य' हा विषय चर्चेत आहे. पाहा - पृष्ठ क्रमांक ७ ते १२) मुस्लिम देशांच्या राजकारणात इस्लाम धर्म हा केंद्रस्थानी असतो हे देखील खरे आहे. ही काही फारशी चांगली किंवा अपवादात्मक बाब नाही. युरोपमधील देश, अमेरिका, तैवान, जपान किंवा भारत येथे देखील धर्म व राजकारण हे जोडले गेले आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य वाढल्यास व लोकशाही प्रस्थापित झाल्यास, समाजकारणात व राजकारणात धर्माची गरज कमी कमी होत जाईल, असेही नाही. आणि हे मान्य करणारा टोक्विली हा एक विचारवंत होता. उलट त्याचे असे म्हणणे होते की लोकशाही असलेल्या देशांमध्ये, राजकारणात धर्माचा संदर्भ आणखी महत्त्वाचा ठरूही शकेल. लोकशाहीचा जयघोष करणाऱ्या अमेरिकेत, अलीकडे धर्माचे प्राबल्य वाढते आहे, यावरून त्यांचे म्हणणे खोटे नाही असे दिसते. लोकशाहीसाठी धार्मिक संघटना व नागरी समाज यांचा परस्परसंबंध योग्य ठरू शकतो आणि धार्मिक संघटना या, नागरी समाज किंवा राजकीय संघटना यांच्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात, असेही या विचारवंताने म्हटले आहे. कदाचित इस्लामच्या संदर्भातही त्यांचे मत योग्य ठरेल ! ■■

सामाजिक

# मुस्लिम स्त्रिया: 'मोकळ्या' श्वासाकडे !

मध्य आशियात, मुस्लिम देशांमध्ये एक स्वागतार्ह घटना घडते आहे. हळूहळू आणि दिखाऊपणे का होईना, पण बदलत्या जगात, मुस्लिम स्त्रियांना त्यांचे हक्क आणि बुरख्यापलीकडचे स्वातंत्र्य मिळावे, अशी चर्चा घडून येत आहे. तसेच त्यादृष्टीने काही पावले उचलण्यात येत आहेत. मुस्लिम देशांमध्ये स्त्रियांचे हक्क, स्वातंत्र्य व त्यांचे कुटुंबाबाहेरील समाजाशी असलेले संबंध यात बरीच भिन्नता आहे. (मुस्लिम संस्कृती मध्य आशिया, दक्षिण आशिया आणि आफ्रिकेच्या उत्तर भागातील काही देशांमध्ये पसरलेली आहे. खालील नकाशा पाहावा. नकाशातील क्रमांकाप्रमाणे काही महत्त्वाच्या देशांची नावे अशी - मोरोक्को, अल्जिरिया, लिबिया, चड, इजिप्त, सुदान, इथिओपिया, सोमालिया, सौदी अरेबिया, येमेन, इराक, इराण, सिरिया, टर्की, संयुक्त अरब अमिराती, अफगाणिस्तान, तुर्कमेनिस्तान, पाकिस्तान, भारत, मलेशिया व इंडोनेशिया.)




बदलत्या जगातील परिस्थिती लक्षात घ्यायला हवी. काही देश काही बाबतीत पुढारलेले आहेत तर काही देश मागासलेले. काही मध्यममार्ग स्वीकारतात तर काही देशांमध्ये फारशी चर्चा न होता 'जैसे थे' परिस्थिती कायम राहते. सौदी अरेबियात, अलीकडेच (१३ ते १५ जून २००४), मुस्लिम 'स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य' या विषयावर एक राष्ट्रीय चर्चा झाली. (मुस्लिम स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन केलेल्या या चर्चेत संवाद तर साधला जातच होता, मात्र, दूरचित्रवाणीवरील प्रक्षेपणाच्या काळाचा अपवाद वगळता, पुरुषांना स्त्रियांचे चेहरे दिसणार नाहीत, अशी व्यवस्थाही करण्यात

आली होती !) सौदी अरेबियात बालशिक्षण ते विद्यापीठीय शिक्षण आणि अशी काही मोजकी क्षेत्रे वगळली, तर बहुतांश क्षेत्रे स्त्रियांसाठी खुली नाहीत. मोटारी किंवा विमाने चालविणे, जहाज हाकारणे ही कामे स्त्रियांना करण्याची परवानगी नाही. तसेच घराबाहेर पडल्यानंतर मनगट, पायाचे घोटे वा मस्तकावरील भुरभुरणारे केस दाखविण्यास बंदी आहे. म्हणजे स्त्रियांना येथे 'नखशिखांत' बुरखा घालावा लागतो. पुरुषांच्या परवानगीशिवाय स्त्रियांना येथे घराबाहेर पडता येत नाही.

स्त्रियांच्या स्वातंत्र्याबाबत झालेल्या चर्चेतील काही सूचना मान्य करण्यात आल्या तर ही परिस्थिती सुधारण्याची थोडी शक्यता आहे. स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष न्यायालये, सध्याच्या न्यायालयांमधील महिला विभागांची संख्या वाढविणे आणि स्त्रियांसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असण्याबाबतच्या मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत. स्त्रियांना अधिक शिक्षण व अधिक नोकऱ्या उपलब्ध व्हाव्यात आणि 'स्त्रियांचे हक्कां'बरोबरच त्यांना 'मानवी हक्क' अधिक प्रमाणात मिळावेत, तसेच स्त्रियांच्या प्रश्नाबाबत, स्वेच्छाकार्य करणाऱ्या संस्थांची संख्या वाढावी, अशी अपेक्षाही राजघराण्याकडे पोचविण्यात आली आहे. अर्थात, सौदी अरेबियातील स्त्रियांची परिस्थिती अगदीच दयनीय आहे, असेही नाही. काही स्त्रियांच्या मते बुरखा घालणे वा डोक्यावर रुमाल बांधणे ही स्वेच्छेची, धार्मिक श्रद्धेची बाब आहे. असे संरक्षण असणे हे तेथे प्रतिष्ठितही मानले जाते. १९६४ पर्यंत येथे मुलींना शाळेत पाठविण्यात येत नव्हते. आता ही परिस्थिती बदलली असून प्राथमिक शिक्षणात तर मुलींची संख्या वाढलीआहेच, शिवाय विद्यापीठीय शिक्षणातही ५५ टक्के मुली आहेत.

स्त्री-शिक्षणात बहुतेक मुस्लिम देशांनी सुधारणा केली आहे. १९६० मध्ये मुलींच्या शालेय शिक्षणाची सरासरी फक्त ६ महिने होती, ती आता ४.५ वर्षे एवढी वाढली आहे. १९७० पासून ट्यूनिशियाने स्त्री-पुरुष यांच्या साक्षरतेतील विषमता ८० टक्क्यांनी कमी केली आहे. जॉर्डनने संपूर्ण साक्षरतेचे उद्दिष्ट गाठले आहे. स्त्रियांच्या आरोग्याच्या संदर्भातही मुस्लिम देशांनी बऱ्यापैकी प्रगती केली आहे. १९७० मध्ये स्त्रियांचे सरासरी आयुर्मान ५२ वर्षे होते ते आता ७० वर्षे झाले आहे. तसेच स्त्रियांना होणाऱ्या मुलांच्या संख्येतही निम्म्याने घट झाली आहे.

असे असले तरी, सर्वसाधारणपणे स्त्री -स्वातंत्र्याचा विचार करता मुस्लिम देशांमधील स्त्रियांचे जीवन खुपसे सुधारलेले नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'अरब ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट'मध्ये, 'स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य' हा आव्हानाचा मुख्य विषय आहे,

असे नमूद करण्यात आले आहे. अरब देशांमध्ये स्त्रियांच्या संदर्भातील सर्वच आकडेवारी, नेहमीच उपलब्ध होते असे नाही. उदाहरणार्थ, स्त्रियांचा विविध प्रकारे होणारा छळ व त्यांसंदर्भातील आकडेवारी सहसा उपलब्ध होत नाही. बुरख्यात लपलेली त्यांची घुसमटही बाहेर पडणे फार कठीण असते. तसेच स्त्रियांनी अविवाहित राहण्याची कल्पना येथील समाजमनात रुजलेली नाही, त्यामुळे विवाह न करण्याचा अधिकार येथील स्त्रिया वापरू शकत नाहीत. अत्याधुनिक फॅशन्सचा पेहराव येथे चालत नाही, त्यामुळे त्यासंबंधीची चैन-मौज किंवा मैत्रिणींबरोबर भटकण्याचा आनंद हा येथील मुलींना, स्त्रियांना मिळतो असेही नाही.

सौदी अरेबियातील मुलींना विद्यापीठीय शिक्षण घेता येत असले तरी त्यांचे करियर हा प्रश्न दुर्लक्षितच राहतो. तेथे नोकरी करणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या फक्त ६ टक्के आहे. येमेनमधील स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ५४ टक्के आहे, तर इजिप्तमध्ये मुलांच्या तुलनेत बालवयात मृत्युमुखी पडणाऱ्या मुलींची संख्या जास्त आहे. अल्जिरियात देखील स्त्रियांची स्थिती फारशी चांगली नाही.

स्त्रियांच्या स्वातंत्र्याबाबत नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी करण्यात आलेल्या 'झॉग्बी इंटरनॅशनल'च्या सर्वेक्षणातून (खालील तक्ता पाहावा) असे आढळले की,

**अरब देशांमध्ये स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य यात सुधारणा करण्याबाबत गांभिर्याने विचार करणाऱ्यांची टक्केवारी** (झॉग्बी इंटरनॅशनल)

| देश | नागरिक | | एकूण | वयोगट | | उच्च माध्यमिक | पदवी किंवा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | टक्केवारी | १८-२९ | ३०+ | शिक्षण वा कमी | त्यापेक्षा जास्त |
| लेबनॉन | ५० | ५९ | ५५ | ५७ | ५५ | ५२ | ५८ |
| जॉर्डन | २५ | ५३ | ४१ | ४८ | ४३ | ३४ | ४९ |
| कुवैत | ४० | ५४ | ५१ | ५४ | ४९ | ३७ | ७३ |
| संयुक्त अरब -अमिराती | २९ | ३४ | ३४ | ४३ | २८ | ३० | ४३ |
| मोरोक्को | ४३ | ५२ | ४९ | ५३ | ४५ | २१ | ७८ |
| सौदी अरेबिया | ७३ | ६८ | ७० | ७२ | ६९ | ५२ | ८७ |
| इजिप्त | ५३ | ५२ | ५१ | ४७ | ५४ | ४४ | ५८ |

येथील पुरुषांची मने (काही ठिकाणी स्त्रियांची देखील) मात्र अद्याप स्त्री-स्वातंत्र्याचा

विचार करण्यास उत्सुक नाहीत. 'स्त्रियांचे स्वातंत्र्य' म्हटले की त्यांच्यात काहीसा अलिप्तपणा त्यांच्यात आढळतो. एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे, सध्यातरी स्त्री-स्वातंत्र्याला सर्वात जास्त पाठिंबा सौदी अरेबियातून मिळालेला आहे.

अरब देशांमध्ये स्त्री स्वातंत्र्याचे वारे आत्ता वाहताना दिसत असले तरी यापूर्वी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार इतरही काही देशांनी केला आहे. ट्यूनिशियाने स्त्रियांना समानता दिली असून इस्लामच्या विरोधात जाऊन बहुपत्निकत्वावर बंदी घातली आहे. येथील स्त्रियांना मतदानाचा, घटस्फोट देण्याचा आणि विविध क्षेत्रात नोकऱ्या करण्याचा अधिकार आहे. अरब देशांमध्ये, ट्यूनिशियातील स्त्रियांचे स्वातंत्र्य हा एक चर्चेचा विषय आहे. तरीदेखील येथील स्त्रियांची तक्रार आहे की, स्त्रियांप्रती पुरु षांचा दृष्टिकोण अजून बदललेला नाही.

इजिप्त हा देखील स्त्री-स्वातंत्र्याला महत्त्व देणारा देश आहे. अरब देशांमधील स्त्री-स्वातंत्र्याचा पहिला जाहीरनामा, 'द लिबरेशन ऑफ वुमन' हा, काईरो शहरात १८९९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. १९२० मध्येच येथील स्त्रियांनी बुरखा वापरणे बंद करायला सुरूवात केली होती. १९६० मध्ये येथे डॉक्टर झालेल्या स्त्रियांची संख्या पश्चिमेकडील काही देशांच्या तुलनेत जास्त होती. १९८० मध्ये या सुधारणांना खीळ बसली ती तत्कालीन सरकारने, खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता व्यवहारात आणू शकणारा एक कायदा करण्याचे नाकारले तेव्हा.

अरब देशांमधील स्त्रियांच्या स्थितीबाबत बरेचदा 'इस्लाम'ला दोषी ठरविण्यात येते. पण, नेहमीच 'धर्म' ही एकच बाब यासाठी जबाबदार असते असेही नाही. मोरोक्को या देशाने कौटुंबिक पातळीवर स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी अलीकडेच काही नवीन कायदे केले आहेत. यात महत्त्वाचा म्हणजे घटस्फोटाचा दावा पती व पत्नी या दोघांनाही करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच यासंदर्भात मुलांची जबाबदारी स्वीकारण्याबाबतही दोघांना न्यायालयात चर्चा करता येणार आहे. इस्लामच्या नियमांत बसणारीच ही सुधारणा आहे, असेही येथे म्हटले गेले आहे. कुवैतमध्ये देखील धर्माच्या आधारे, स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यात आली आहे. मुस्लिम देशांमध्ये धर्माचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे लावण्यात येत असल्यामुळेही स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात वेगवेगळे मतप्रवाह आहेत. विशेषतः सौदी अरेबियात ही चर्चा मोठ्या प्रमाणावर होत आहे.

*(संदर्भ -द इकॉनॉमिस्ट, १९ जून २००४, इंटरनेट)*

सामाजिक

# आम्हालाही आवाज आहे...!

'इस्लाम धर्म व मुस्लिम स्त्रियांचे हक्क आणि स्वातंत्र्य' या विषयाने, या शतकाच्या सुरूवातीला बरेच महत्त्व मिळविले आहे. बदलत्या जगात या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन, जर्मनीतील (बर्लिन) 'फेडरल फॉरिन ऑफिस'ने या विषयावर आणि विशेषतः जर्मनीतील मुस्लिम स्त्रियांच्या संदर्भात, एक अधिवेशन २४ मे २००४ रोजी आयोजित केले होते. २० इस्लामिक देशांतील विविध क्षेत्रांतील निवडक स्त्रिया यात सहभागी झाल्या होत्या. भारत या बिगरइस्लामी देशातील डॉ. सईदा सय्यिद्न हमीद या एकच महिला प्रतिनिधी, या अधिवेशनाला उपस्थित राहिल्या होत्या. भारत हा बिगरइस्लामी देश असला तरी भारतातील मुस्लिम नागरिकांची संख्या लक्षात घेता 'इस्लाम धर्म व मुस्लिम स्त्रियांचे हक्क आणि स्वातंत्र्य' हा विषय भारताने देखील गांभिर्याने घ्यावा असाच आहे. डॉ. सईदा हमीद यांचे या अधिवेशनातील अनुभव 'जर्मन न्यूज'च्या (भारतातील दिल्लीस्थित जर्मन दूतावासातर्फे प्रकाशित होणारे नियतकालिक) जुलै २००४च्या अंकात प्रसिद्ध झाले आहेत.

अधिवेशनाच्या उद्घाटनपर भाषणात मुस्लिम स्त्रिया व हिजब (डोक्यावर बांधायचा मोठा रुमाल) हा विषय उपस्थित करण्यात आला. सध्या युरोपमध्ये हा विषय गाजतो आहे; कारण फ्रान्सने असा रुमाल बांधण्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. (पाहा :- अर्थबोधपत्रिका, जानेवारी २००४) जर्मनीत देखील असा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संदर्भात वैचारिक मंथन व्हावे, म्हणून हा विषय उपस्थित करण्यात आला होता.

डॉ. सईदा हमीद यांनी यासंदर्भात भाष्य केले आहे की, मुस्लिम स्त्रियांचा पोशाख हा इस्लामने ठरविलेला व विशिष्टच असा नाही. उदाहरणार्थ, या अधिवेशनाला उपस्थित मुस्लिम स्त्रियांच्या पोशाखात विविधता जाणवत होती. रुमाल बांधलेल्या, न बांधलेल्या, सरोंगा किंवा इतर पोशाखाशिवाय जीन्स व पँटस् किंवा साडी ते मिडी घातलेल्या प्रतिनिधी येथे उपस्थित होत्या. सौदी अरेबिया, सिरिया, मोरोक्को, पाकिस्तान, इंडोनेशिया, इराण, सुदान आणि भारत अशा अनेक देशांमधील स्त्रियांचे पोशाख त्या देशातील पद्धतींना अनुसरून होते किंवा त्यांना सोयीचे वाटत असतील, असे होते.

याचा अर्थ, इस्लामवर पूर्ण श्रद्धा असणे आणि स्त्रियांचा पोशाख या दोन वेगळ्या बाबी आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या सत्राचा विषय 'मुस्लिम स्त्रियांचे हक्क आणि वेगवेगळ्या देशांमधील त्या संदर्भातील परिस्थिती', हा होता. अनेक देशांमधील स्त्रियांनी आपापली मते मांडली. या सत्राचा समारोप करतेवेळी स्त्रियांचे एकमत झाले की, इस्लामने स्त्रियांना बऱ्याच प्रमाणात हक्क दिले आहेत, असे दिसते. पण मुस्लिम स्त्रियाच आपल्या हक्काबद्दल पुरेशा प्रमाणात जागरुक आहेत, असे नाही. तसेच, पुरुष देखील, कधी धर्माच्या नावाखाली तर कधी रूढी-परंपरेच्या नावाखाली चालत आलेले आपले वर्चस्व कमी करण्याच्या स्थितीत नाहीत. त्यामुळे स्त्रियांनी, स्त्रियांसाठी व स्त्रियांच्या दृष्टिकोणातून आणि काळाचे बदलते संदर्भ लक्षात घेऊन, इस्लामचा अभ्यास करणे गरजेचे झाले आहे. स्त्रियांनी डोक्यावर रुमाल बांधावा किंवा नाही यापेक्षा जाहिराती वा इतर ठिकाणी तिच्या देहाचा होणारा गैरवापर किंवा त्यांना भोगावे लागणारे शारीरिक व मानसिक अत्याचार दूर करणे, स्त्रियांना आत्मसन्मानाने जगता यावे, यासाठी प्रयत्न केले जावेत, असाही विचार येथे मांडण्यात आला. मुस्लिम देशांतील स्त्रियांप्रमाणेच इतरही काही देशांमधील स्त्रियांची परिस्थिती चांगली नाही, तेव्हा जागतिक पातळीवर स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही मत येथे व्यक्त करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात, 'पुरुषांच्या समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये मुस्लिम स्त्रियांचा सहभाग' या विषयावर चर्चा झाली. मुस्लिम स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हाही विषय येथे चर्चिला गेला. या सत्राचा सूरही इस्लामने स्त्रियांना अनेक प्रकारचे हक्क दिले असले तरी व्यवहारात ते अंमलात आणले जात नाहीत आणि पुराणमतवादी लोकांनी इस्लामचा प्रचार त्यांच्याच दृष्टिकोणातून केल्याने स्त्रियांना समान संधी उपलब्ध होत नाहीत, असाच होता. उदाहरणार्थ, वाहने चालवू नयेत किंवा कार्यालयांमध्ये नोकरी करू नये वा परपुरुषांशी कार्यालयीन व्यवहार करू नयेत, असे काही इस्लाममध्ये म्हणण्यात आलेले नाही, हे स्पष्ट करण्यात आले. तिसऱ्या सत्रात, 'जर्मनीतील मुस्लिम स्त्रियांनी विविध क्षेत्रांतील आपले अनुभव' मांडले. विविध देशांमधील संस्कृती वा धर्म हे वैयक्तिक व सामाजिक प्रगतीसाठी अडथळे ठरायला नको तर त्यांच्या मदतीने सर्वांना पुढे जाता यावे, असा विचार यावेळी पुढे आला. 'आम्हालाही आवाज आहे,' असे म्हणत, पण, इस्लामची काठी हातात धरून पुढे जाण्याची आंस बाळगणाऱ्या मुस्लिम स्त्रियांचे चित्र या अधिवेशनातून पुढे आले. ■■

राजकीय


# दक्षिण आशिया: औद्योगिक जगात आंतरराष्ट्रीय दहशतवाद

भारतात, काही दिवसांपूर्वी (जून २००४) मुंबई, पुणे व काही महत्त्वाच्या शहरांमधील आर्थिक वा लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या केंद्रांवर हल्ले करण्याची अतिरेक्यांची योजना होती, असे उघडकीस आले होते. वेगवेगळ्या संघटनांचा दहशतवाद हा फक्त भारतापुरता मर्यादित राहिलेला नाही; तर, पश्चिमेकडील राष्ट्रांपासून पूर्वेकडील राष्ट्रांपर्यंत तो पसरलेला असून ही एक आंतरराष्ट्रीय समस्या झालेली आहे, याची आता सर्वांनाच कल्पना आहे. अलीकडेच, विविध देशांमधील गुप्तचर संस्थांना मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण आशियातील प्रामुख्याने इंडोनेशियातील, राजकीय, सामाजिक आणि विशेषतः औद्योगिक वर्तुळात वावरणाऱ्या मोठ्या व्यक्तींवर हल्ले करण्याची योजना, जेमा इस्लामिया या अतिरेकी संघटनेने आखली आहे. इंडोनेशिया, मलेशिया व थायलंड या देशांमध्ये प्रामुख्याने काम करणारी ही संघटना अल् -कायदा या अतिरेकी संघटनेशी संबंधित आहे, असे म्हटले जाते. या तीनही देशांमधील अतिरेकी कारवायांबद्दलचा अभ्यास आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञ करीत आहेत.

## इंडोनेशिया

इंडोनेशियात, वर उल्लेखित योजना राबविण्यासाठी या संघटनेच्या काही अतिरेक्यांनी फिलिपिन्सच्या दक्षिणेला असलेल्या मिंदानाओ येथून इंडोनेशियाच्या अखत्यारीतील कलीमंटन (पुढील पानावरील नकाशा पाहावा) येथे प्रवेश केला असल्याचे गुप्तचरयंत्रणेचे म्हणणे आहे. अतिरेक्यांच्या दृष्टीने, त्यांच्या शत्रूगटात मोडणाऱ्या देशांचे, परदेशांमध्ये आर्थिक व राजकीय नुकसान करण्याचे हे कारस्थान आहे. तेव्हा मोठे स्फोट घडवून आणण्यापेक्षा अतिरेक्यांनी छोट्या प्रमाणावर हल्ले करून विविध देशांच्या दूतावासातील अधिकारी, औद्योगिक क्षेत्रातील काही व्यक्ती अशा काहींना 'लक्ष्य' करण्याचे ठरविले आहे. कारण, इंडोनेशियात, जकार्ता येथील मॅरियॉट हॉटेलमध्ये बॉंबस्फोट करण्यात आला तेव्हा त्यात इंडोनेशियातील ११ आणि फक्त एक परदेशी नागरिक ठार झाला आणि यावर जेमा इस्लामियाचे नेतृत्व नाराज झाले होते. बॉंबस्फोटात मुस्लिम नागरिक ठार होऊनये म्हणून आता, त्यांनी आपली कार्यपद्धती बदलण्याचे ठरविले आहे, असे दहशतवादाचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनी म्हटले आहे. यामुळे इंडोनेशियातील काही

देशांच्या दूतावासातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. याशिवाय इंडोनेशियातील पाश्चिमात्य नागरिकांनी काळजी करावी अशी एक घटना या वर्षीच्या मे महिन्यात घडली आहे.




सुलावेसी हा इंडोनेशियाच्या अखत्यारीतील भाग आहे. (वरील नकाशा पाहावा) हा भाग जेमा इस्लामियाचा प्रभाव असलेला असा समजला जातो. अतिरेक्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अल् -कायदाने येथे तळ उभारले होते. या भागातील सरकारी वकील फेरी सिलालाही हे चर्चमधून घरी परत येत असताना अतिरेक्यांनी त्यांची गोळ्या घालून हत्या केली. ऑक्टोबर २००२ मध्ये बाली येथे बॉंबस्फोट घडवून आणण्यास मदत केल्याबद्दल काही व्यक्तींवर आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्यापैकी तिघांसंबंधीचा खटला सिलालाही यांनी चालविला होता आणि त्यात जेमा इस्लामियाला यासाठी दोषी ठरविले होते.

इंडोनेशियातील अमेरिका, ब्रिटन व ऑस्ट्रेलियाचे राजदूत आणि या देशांच्या दूतावासातील अधिकारी, तसेच तेल, ऊर्जा व खाण या उद्योगातील मोठ्या कंपन्यांमधील अधिकारी यांना लक्ष्य करण्याचे जेमा इस्लामियाने ठरविले आहे. यामुळे काही कंपन्यांनी आपल्या अधिकाऱ्यांसाठी सुरक्षा सैनिक नेमले आहेत. शिवाय या उच्चपदस्थ व्यक्तींनी आपले जाण्या-येण्याचे मार्ग सतत बदलावेत, अशा सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. सौदी अरेबियातील तेल कंपन्यांवर अतिरेक्यांनी हल्ला केल्याची घटना अलीकडेच घडली आहे. या पार्श्वभूमीवर इंडोनेशियातील तेल कंपन्यांना सुरक्षाविषयक इशारे देण्यात आले आहेत. इंडोनेशियातील एक्सॉन मोबिल, कोनॅको, फिलिप्स व इतरही

काही मोठ्या कंपन्या अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असल्याचे गुप्तचर यंत्रणेने म्हटले आहे. गेल्या वर्षी इंडोनेशियातील सैनिकांनी पापुआ भागात, सोन्याची खाण असलेल्या प्रदेशात, अल् -कायदाशी संबंधित असल्याच्या संशयावरून ३० वर्षीय येमेनी नागरिकाला अटक केली होती. जकार्ता येथून तो पोलिस कोठडीतून निसटला. या खाणीसंबंधीची एक चित्रफीत अल् -कायदाने आपल्या प्रचारासाठी वापरली आणि त्यात अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्या मुस्लिम कामगारांचे शोषण करतात, असे नमूद करण्यात आले होते. अतिरेकी कारवाया वाढण्यामागे असलेली कारणे म्हणजे, जेमा इस्लामियाचा धार्मिक नेता अबु बक्र बशीर याला पुन्हा करण्यात आलेली अटक आणि त्याच्यावरील खटला, तसेच इराकमधील कैद्यांना देण्यात येणारी अमानवी वागणूक व त्यांचा छळ ही होय, असे म्हटले जात आहे. दहशतवादाचा प्रश्न सोडविण्याबाबत इंडोनेशियाच्या राजकीय नेतृत्वाच्या इच्छाशक्तीचा अभाव व तेथील कायद्याची लंगडी बाजू यांमुळे येथील अतिरेकी संघटनांचे फावते आहे, असे तज्ज्ञांना वाटते.

**थायलंड**

थायलंडच्या दक्षिण भागात, तायोंगमात व सभोवतालच्या गावांमध्ये, गेल्या काही वर्षांपासून मुस्लिम फुटीरतावाद्यांच्या कारवाया मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. या स्थानिक फुटीरतावाद्यांचे अतिरेकी संघटनांशी संबंध असावेत, असा अंदाज आहे. या वर्षाच्या सुरूवातीला, जानेवारी महिन्यात, फुटीरतावाद्यांनी शाळा व सैनिकांच्या छावण्या यांच्यावर हल्ले केले होते आणि शस्त्रास्त्रे पळविली होती. पोलिस अधिकारी, बौद्ध भिक्खू आणि शिक्षक इत्यादींवर अतिरेक्यांनी हल्ले केले व ४५ जणांना ठार केले. मुस्लिम नागरिकांचे अपहरण करण्याच्या घटनांमध्येही येथे वाढ झाली. नंतर तेथे मार्शल लॉ आणि कर्फ्यू लागू करण्यात आला होता. मग एप्रिल महिन्यात थायलंडचे सैनिक व फुटीरतावादी यांच्यात मोठी चकमक होऊन किमान १०७ अतिरेकी व पाच सैनिक ठार झाले.

थायलंडमध्ये बौद्ध धर्मियांची संख्या अधिक आहे. येथील फुटीरतावाद्यांची फार जुनी तक्रार आहे की, बौद्ध धर्मीय बहुसंख्य असल्याने, थायलंडचे सरकार त्यांना मुस्लिमांच्या तुलनेने झुकते माप देते. १९६० च्या दशकात येथे मुस्लिम फुटीरतावादाचे बीज पडले आणि अशा तक्रारींमुळे ते रुजण्यास व वाढण्यास मदत झाली. १९९७ मध्ये थायलंडच्या घटनेनुसार नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार मंजूर करण्यात आला आणि स्थानिक पातळीवरील लोकशाही वाढण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

यामुळे तेथील तणाव कमी होण्यास मदत झाली. मात्र, मुस्लिम अतिरेक्यांनी दक्षिण आशियात जम बसवायला सुरूवात केल्यानंतर येथील फुटीरतावाद पुन्हा वाढू लागला.

फुटीरतावादाच्या विरोधात गेली तीन दशके लढा देणारे थायलंडमधील एक लष्करी अधिकारी किट्टी यांच्या मते, मुस्लिम फुटीरतावादी आपली शक्ती वाढविण्यासाठी काही काळ गप्प बसले होते. या काळात ते आपले विचार धार्मिक शाळांमधून समाजात पसरवीत होते. ते आता सर्वशक्तीनिशी लढण्यास तयार झाले आहेत, दरम्यान थायलंडची सुरक्षायंत्रणा मात्र दुबळी होत गेली आहे. किट्टी असेही म्हणतात की, इंडोनेशियातील अतिरेकी गटाकडून या फुटीरतावाद्यांनी प्रशिक्षण घेतले आहे आणि इंडोनेशियातील जेमा इस्लामियाच्या कारवाया आता थायलंडमध्येही सुरू झाल्या असून त्यांनी येथील स्थानिक मुस्लिमांना आपल्याकडे भरती करून घेतले आहे. यात तथ्य असेल तर दहशतवादाविरूद्धच्या अमेरिकेच्या लढाईला, आता दक्षिण आशियाच्या भूमीवरून प्रत्युत्तर दिले जात आहे, असे म्हणता येईल. दहशतवादाविरूद्धच्या अमेरिकेच्या लढाईत थायलंडचा सहभाग आहे, हे येथे उल्लेखनीय.

गेल्या वर्षी जेमा इस्लामियाच्या हंबाली या अतिरेक्याला बँकॉकच्या नजीक अटक करण्यात आली होती. अमेरिकेची गुप्तचर यंत्रणा व थायलंडमधील गुप्तचर यंत्रणा आता अतिरेक्यांचा शोध घेत आहेत. खरे अतिरेकी कोण व स्थानिक गुन्हेगार कोण हे कसोशीने तपासले जात आहे. दरम्यान काही स्थानिक नागरिक मात्र येथील बिघडलेल्या परिस्थितीसाठी अमेरिकेला दोषी ठरवीत आहेत. थायलंडच्या दक्षिण भागातील या प्रश्नाला अमेरिका विनाकारण आंतरराष्ट्रीय स्वरूप आणत आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. तर, येथील अस्थिरता वाढण्यामागे काही स्थानिक गुन्हेगार व राजकीय नेते यांचाही सहभाग असावा, असा आरोप थायलंडचे पंतप्रधान थकसीन शिनावात्रा यांनी केला आहे. मलेशियातील नागरिकांकडून अतिरेक्यांना पाठिंबा मिळतो आहे किंवा कसे याचाही शोध घेण्यात येत आहे. याच घडामोडींशी संबंधित आणखी एक घटना अलीकडेच घडली आहे. मलेशियात वास्तव्यास असणारे थायलंडच्या फुटीरतावादी बेरसातु गटाचे नेते व दक्षिण आशियातील फुटीरतावादी चळवळीचे अभ्यासक वॅन कादिर चे मॅन यांनी, थायलंडमधील शांततेसाठी आपल्याला राजकारणात पद मिळावे अशीही मागणी केली आहे. सध्यातरी, थायलंड, इंडोनेशिया व मलेशिया या तीनही देशांमध्ये दहशतवादाचा प्रश्न अनुत्तरित आहे. *(संदर्भ - फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू १७ जून, ३ जून, २० मे व ११ मार्च २००४, इंटरनेट)* ■■

आर्थिक

# 'शायनिंग' चीन (?) व भारतातील विषमता कमी होण्यासाठी....

चीनची प्रगती हा सध्या जगात चर्चेचा व कुतूहलाचा विषय झाला आहे. गेल्या आर्थिक वर्षात, चीनमधील एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या वाढीचा दर (GDP growth rate) हा ९.७ टक्के एवढा असल्याचे अधिकृतरित्या सांगण्यात येत असले तरी, काही अर्थतज्ज्ञांच्या मते तो १३ टक्के एवढा असण्याचीही शक्यता आहे. तसेच गेल्या नऊ वर्षांत प्रथमच चीनच्या मध्यवर्ती बँकेकडून व्याजाचे दर वाढण्याची शक्यता असल्याची चर्चा जोरात आहे. असे असले तरी चीनमधील विषमताही मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य नागरिकांना चीनच्या प्रगतीचा फारसा उपयोग झालेला नाही. चीनमध्ये 'शायनिंग चीन' असे म्हणण्यात आले नसले तरी, 'शायनिंग इंडिया' (पाहा अर्थबोधपत्रिका -जुलै २००४) प्रमाणेच चीनची स्थिती आहे.

म्हणूनच, 'विकासाची फळे चीनमधील सर्व नागरिकांना चाखायला मिळाली नाहीत, तर चीनमधील सामाजिक स्थैर्य धोक्यात येऊ शकेल,' असा गंभीर इशारा जागतिक बँकेचे अध्यक्ष जेम्स वुल्फेन्सन यांनी अलीकडेच (मे २००४) चीनमधील निवडक व्यक्तींच्या एका विशेष कार्यक्रमात दिला आहे. देशांतर्गत संपत्तीत सर्वांचा वाटा असावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. ब्राझील, अर्जेन्टिना यांच्यासह लॅटिन अमेरिकेतील काही देशांनी विषमतेचा हा प्रश्न व त्यातून निर्माण होणारी सामाजिक अस्थिरता अनुभवली आहे, असेही त्यांनी उदाहरणादाखल स्पष्ट केले. काही मोजकी राष्ट्रे सोडली तर संपूर्ण जगातच विषमतेचा प्रश्न आहे, ही वस्तुस्थिती आहे. आशियातही विषमतेचा प्रश्न फक्त चीनपुरताच मर्यादित नाही; तर भारत व इतरही अनेक देशांमध्ये हा प्रश्न आहेच. त्यामुळे वुल्फेन्सन यांचा इशारा अधिक गांभिर्याने घ्यावा असाच आहे, असे त्यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. विकासासाठी आणि विविध प्रकल्पांसाठी आर्थिक मदत म्हणून जागतिक बँकेने १९८१ पासून २००३ च्या मध्यापर्यंत चीनला ३७ बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी मदत केली आहे. वुल्फेन्सन यांची काळजी अशी आहे की, चीनचे सध्याचे आर्थिक यश हेच तेथील सामाजिक अस्थैर्यासाठी कारणीभूत ठरेल की काय ? असे वाटण्यामागे अनेक कारणे आहेत.

## चीनमधील गरिबी व विषमता

आजही चीनच्या ग्रामीण भागात, दारिद्रयात राहणारी आणि शेती किंवा शेतीसंबंधीच्या इतर छोट्या उद्योगात अहोरात्र खपणारी गरीब कुटुंबे आहेत; तर शहरी भागात नवनवीन मोटारींच्या व इतर ग्राहकोपयोगी वस्तूंच्या मागे धावणारा नवश्रीमंत वर्ग आहे. सर्वसाधारणपणे चीनमधील गरिबीचे प्रमाण कमी झाले आहे; नागरिकांची मिळकत वाढत असल्याचे चित्र असले तरी शहरी भागाच्या उत्पन्नाच्या दराच्या तुलनेत, ग्रामीण भागातील नागरिकांचे उत्पन्न त्याच्या निम्म्या दराने वाढले आहे. सध्या, चीनमधील विषमता ही इतर विकसनशील देशांच्या एवढीच आहे. पण पंचवीस वर्षांपूर्वी चीनमधील विषमतेची दरी फार अरुंद होती; त्या तुलनेत ती आता फारच वाढलेली दिसते. आणि ही विषमता याच गतीने वाढली तर आजपासून दहा वर्षांनी ही दरी जगात सर्वात जास्त रुंद झालेली असेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

एक उल्लेखनीय बाब म्हणजे, चीनमध्ये वीस वर्षांपूर्वी अन्न व वस्त्र या प्राथमिक गरजा पूर्ण न झालेल्या नागरिकांची संख्या २० कोटी होती, ती आता २ कोटी ९० लाख एवढी कमी झाली आहे. चीनमधील आर्थिक सुधारणांमुळे गरिबीत राहणाऱ्या या नागरिकांचे जीवनमान थोडेसे सुधारले असले तरी विकासाच्या पायऱ्यांवर चढण्याएवढी या नागरिकांची क्षमता वाढलेली नाही. आजही चीनमध्ये ४० कोटी नागरिकांची मिळकत दर दिवसाला दोन डॉलर्सपेक्षा कमी (म्हणजे भारतीय चलनानुसार दिवसाला शंभर रुपयांपेक्षा कमी) आहे. हे नागरिक फक्त गरीबच आहेत, असे नाही तर इतर देशांतील गरिबांवर अनेकदा अन्याय होतात त्याप्रमाणे या नागरिकांनाही पोलिस आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायाला सामोरे जावे लागते. यामुळे आपला पायाच उखडला जातोय की काय, अशी भीती या नागरिकांना वाटू लागली आहे.

यातून त्यांचे नैराश्यही वाढीस लागले आहे. हे नैराश्य वेगवेगळ्या मार्गाने बाहेरही पडले आहे. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी नोकऱ्यांमधील कामगार कपात, ग्रामीण भागातील वाढते कर, शहरांमध्ये राहायला जावे लागणे व त्यासाठी होणारी जबरदस्ती, भ्रष्टाचार इत्यादींच्या विरोधात निदर्शने करण्यासाठी एक कोटी नागरिक रस्त्यांवर आले होते. अशा विविध निदर्शनांपैकी ७०० निदर्शनांच्या वेळी, निदर्शकांचे पोलिसांबरोबर संघर्ष झाले. शिवाय सरकारी कार्यालयांमध्ये विविध प्रकारच्या तक्रारींची संख्या सहा लाखावर पोचली असल्याचे अमेरिकेतील चिनी भाषेतील एका वृत्तपत्राने म्हटले आहे. चीनमधील विषमता ही ग्रामीण व शहरी अशीच फक्त मर्यादित नाही तर त्याला

प्रादेशिकतेचीही जोड आहे. चीनच्या पश्चिमेकडील भागांमध्ये आर्थिक विकास फारसा झालेला आढळत नाही आणि ग्रामीण भागांतील एकूण लोकसंख्येच्या निम्मे लोक या भागात राहतात. आर्थिक विकासाची फळे चाखण्यासाठी चीनमध्ये ग्रामीण भागाकडून शहरी भागांकडे नागरिकांचा ओघ वेगाने वाढतो आहे. शहरीकरणाची ही प्रक्रिया नजीकच्या भविष्यात आणखी वेग घेण्याची शक्यता असून त्यामुळे आणखी वेगळे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहेच. विषमता व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांना सामाजिक व राजकीय पातळीवर तोंड देण्याची तयारी चीनमध्ये झाली आहे का, अशी काही अभ्यासकांची काळजी आहे. अर्थात, सर्वच अभ्यासकांना असे वाटते, असेही नाही.

चीनमधील गरिबी व विषमतेच्या संदर्भात, संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाचे प्रमुख मार्क मॅलोच ब्राऊन यांनी असे म्हटले आहे की, येथील अस्थिरता नजीकच्या भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाढेल असे सध्यातरी वाटत नाही. विकास होण्याच्या काळात समाजात असे घडतच असते. पण बहुसंख्य नागरिकांना वाटते तेवढी ही व्यवस्था दुबळी नसते. ती दणकट व लवचिक असते. याच संदर्भात ब्राऊन असेही म्हणतात की, भारतातील नागरिकांचे नैराश्य व असमाधान हे निवडणुकीच्या वेळी बाहेर पडले, त्यांना तो मार्ग उपलब्ध होता, चीनमध्ये लोकशाही नसल्याने हा मार्ग उपलब्ध नाही, ही एक काळजीची बाब आहे. पण आता चीनमधील नेते यासंदर्भात जागरूक होत आहेत. त्यांची पावले लोकशाहीकडे वळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जागतिक पातळीवर गरिबी दूर करण्याच्या योजना आता मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहेत. त्याला 'सहस्रकाची विकास उद्दिष्टे' (Millennium Development Goals) असे म्हणण्यात आले आहे. यासंबंधीची चर्चा, चीनमध्ये, जागतिक बँकेचे अध्यक्ष वुल्फेन्सन यांच्याबरोबर आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी चीनमधील ज्येष्ठ नेते हुई लिआंगयू यांनी असे सांगितले की, लॅटिन अमेरिकेत उद्भवलेले प्रश्न चीनने जाणून घेतले आहेत. गरीब व श्रीमंत यांच्यातील वाढती दरी, ग्रामीण व शहरी भागांतील विषमता, बेकारी आणि या सर्वांमुळे सामाजिक स्थैर्याला निर्माण झालेला धोका हे काळजीचे विषय असून त्याचा विचारही होतो आहे. सामाजिक स्थैर्याला चीन प्राधान्य देईल, असे आता दिसू लागले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील चीनचे स्थान आता महत्त्वाचे ठरू लागले आहे. परकीय गुंतवणुकदारांना आकर्षित

करण्याचेही चीनचे प्रयत्न आहेत. त्यामुळे आर्थिक, सामाजिक व राजकीय अस्थिरता चीनला आता नको आहे. नागरिकांच्या विचारांना जाणून घेऊन त्यांना सहकार्य करण्याचे धोरण राबविण्याचा प्रयत्न राजकीय वर्तुळात होतो आहे.

## सहस्रकाची विकास उद्दिष्टे व भारत

आर्थिक विकासाची फळे गरिबांपर्यंत पोचली पाहिजेत आणि त्यांचे राहणीमान सुधारले पाहिजे, असे मत भारतातही वारंवार व्यक्त करण्यात आले आहे. किंबहुना, आर्थिक विकासाच्या बाबतीत निराश होऊनच, भारतातील नागरिकांनी, अलीकडेच झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचा पराभव केला, असेही म्हटले गेले आहे. जागतिक पातळीवरील 'सहस्रकाच्या विकास उद्दिष्टा'त भारताचाही समावेश आहे. या प्रक्रियेत खाजगी क्षेत्रातील उद्योग कशाप्रकारे मदत करू शकतात, यासंबंधीचा एक लेख माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रक्रमावर असणाऱ्या 'इन्फोसिस' या कंपनीचे कार्यकारी संचालक नंदन निलेकणी यांनी, 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये लिहिला आहे.

ते म्हणतात, "गरिबी कमी करण्यासाठी खाजगी क्षेत्रातील उद्योग आर्थिक विकास घडवून आणू शकतात. विकासामुळे रोजगार व संपत्ती वाढते, गुंतवणूकही वाढते आणि नवनवीन बाबींचा शोध घेण्यास प्रोत्साहन मिळते. गरीब नागरिकांची खरेदीशक्ती वाढून त्यातून विविध वस्तूंचा व सेवांचा उपभोग त्यांना घेता येतो. जबाबदार उद्योगांनी केवळ स्वतःचा आर्थिक विकास न करता, सामाजिक बांधिलकी मानून समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले पाहिजे. हे कार्य पाच टप्प्यात करता येणे शक्य आहे. मूल्यांना मानणाऱ्या नेतृत्वाने याकामी पुढाकार घेणे, ध्येयनिश्चिती करणे, कृतींचे जाळे विणणे, ते जाळे समाजातील खालच्या स्तरापर्यंत पोचविणे आणि त्याकरवी गरिबांचा दर्जा उंचावणे. विकासाच्या सरकारी योजना राबविण्याच्या कामी उद्योगांनी तज्ज्ञांचे व्यवस्थापन व तंत्रज्ञानविषयक सहकार्य देऊ केले पाहिजे. आणि या योजनांमध्ये समाजातील सर्व घटकांचा सहभाग कसा होईल हेही पाहिले पाहिजे. कृतींचे जाळे विणताना उद्योग-उद्योग, उद्योग-स्वेच्छाकार्य संस्था आणि उद्योग-प्रशासन-नागरिक अशा विविध पातळ्यांवर ते विणले गेले पाहिजे. सध्याच्या काळाची गरज ही सहभागाची आहे, केवळ मदतकार्य असे त्याचे स्वरूप नको. यासाठी, पायाभूत सोयीसुविधा, शिक्षण व आरोग्य ही उद्योगांनी अगदी त्वरेने पावले उचलण्याची क्षेत्रे आहेत."

*(संदर्भ - इकॉनॉमिस्ट -१५ मे २००४, फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू -१० जून २००४, इकॉनॉमिक टाइम्स - २५ जून २००४)* ■■

विज्ञान

# अमेरिकेतील बुश सरकार आणि शास्त्रज्ञ

शास्त्राचा (आणि अर्थातच शास्त्रज्ञांचाही), आपल्याला हवा तसा उपयोग - खरे म्हणजे दुरुपयोग - करता येतो हे उच्च राजकारणी बऱ्याचदा दाखवून देतात. अमेरिकेच्या बुश प्रशासनाने हे अगदी ठळकपणे केले आहे; विज्ञानाचेही राजकारण करण्याचा विडा उचलला आहे.

वास्तविक, सरकार जेव्हा अगदी मोठ्या प्रमाणावर शास्त्रांच्या संशोधनासाठी अर्थसहाय्य करते, तेव्हा तो पैसा असतो, अंतिमतः समाजातील करदात्यांचा. हा पैसा खर्च केला जातो आणि समाज त्याला मान्यता देतो ती एकाच भावनेने. ही संशोधने खर्चिक असली तरी अंतिमतः ती लोकहिताचीच असतात, अशी भावना समाज जपून असतो.

शास्त्रीय संशोधनाचे क्षेत्र हे तसे एक 'स्वतंत्र' क्षेत्र असते; त्याची स्वतःची एक नीती असते; तेथील सर्व व्यवहार हा बुद्धिनिष्ठतेचा नि प्रामाणिकपणाचा, सचोटीचा असावा लागतो. कारण, संशोधन हे निखळ तटस्थतेचे क्षेत्र असते. तेथे खोटेपणा चालत नाही आणि खपवूनही घेतला जात नाही. त्यामुळे जर कोणी शास्त्रज्ञांच्या बौद्धिक सचोटीला शंकास्पद ठरवू लागले तर शास्त्रज्ञांचा वर्ग खवळून उठतो.

तसा तो खवळून उठला आहे. कारण, शास्त्रीय संशोधनाला कोट्यवधी डॉलर्सची मदत करणाऱ्या अमेरिकन सरकारने, शास्त्राला, त्यामधील संशोधनाला नि संशोधकांना आपल्या दावणीला बांधून आपल्याला हवी ती भाषा बोलायला लावण्याचे औध्दत्य दाखविलेले आहे, आज तेथे एक नवाच वाद पेटला आहे.

गेल्या १८ फेब्रुवारीला, साठ प्रमुख शास्त्रज्ञांनी एकत्र येऊन एक अनावृत पत्र प्रसिद्ध केले आहे. वास्तविक या शास्त्रज्ञांपैकी काहीजण हे रिपब्लिकन किंवा डेमोक्रॅटिक सरकारांच्या शास्त्रविषयक धोरण ठरविण्यात सहभागी झालेले होते. या पत्रामध्ये, बुश सरकारवर असा स्पष्ट आरोप करण्यात आला आहे की, जेव्हा शास्त्रीय माहिती ही सरकारच्या राजकीय उद्दिष्टांशी सुसंगत नसते तेव्हा सरकार ती अशा रीतीने बदलून घेते की त्यामुळे, सरकारचे निर्णय 'शास्त्रशुद्ध' असल्याची बतावणी करता येते. या पत्राला

अमेरिकेतील, 'युनियन ऑफ कन्सर्नड सायंटिस्ट' (यूसीएस) या केंब्रिज, मॅसॅच्युसेटस्च्या प्रसिद्ध संस्थेने पाठिंबा दर्शविला आहे, एवढेच नव्हे तर, अशा प्रकारच्या हस्तक्षेपाची आणि सरकारच्या 'सायंटिफिक ॲडव्हायसरी कमिटी'च्या कृत्यांची प्रत्यक्ष उदाहरणेही दिली आहेत.

उदाहरणार्थ, विल्यम मिलर हे न्यू मेक्सिको विद्यापीठातील मानसशास्त्रज्ञ व मानसोपचारतज्ज्ञ आहेत. ते एकदा विशिष्ट पदासाठी मुलाखतीला गेले असता, त्यांना असे प्रश्न विचारण्यात आले होते की, त्यांची मते राष्ट्राध्यक्ष बुश यांच्या मतांशी जुळणारी आहेत का ? आणि त्यांनी २००० साली बुश यांनाच आपले मत दिले होते काय ? विल्यम हॉवर्ड हे एक इंजिनियर आहेत. त्यांनी असे सांगितले की, त्यांना 'आर्मी सायन्स बोर्ड'वर घेण्याचा विचार बदलला गेला कारण, त्यांनी म्हणे, जॉन मॅककेन यांच्या अध्यक्षीय पदाच्या निवडणुकीच्या प्रचारमोहिमेत भाग घेतला होता. (गंमत अशी की, असा भाग त्यांनी घेतलेला नव्हता, तर, त्याच नावाच्या दुसऱ्या गृहस्थांनी भाग घेतला होता !) अशीही कित्येक उदाहरणे यूसीएसच्या अहवालात दिलेली आहेत की केवळ राजकीय मते जुळतात म्हणून कमी पात्रतेची माणसेही 'सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटी'वर नेमली गेली आहेत.

हॉवर्ड गार्डनर हे एक मोठे मानसशास्त्रज्ञ. बुद्धिमत्तेच्या संदर्भातील बहुविध बुद्धिमत्तांचा सिद्धान्त मांडून वैचारिक क्षेत्रात खळबळ माजवणारे. ४ मार्च २००४ रोजी त्यांची एक मुलाखत रेडिओवर झाली. त्यात त्यांनी सांगितलेली गोष्ट अशी की, आरोग्य खात्याचे उपसचिव वेड हॉर्न यांनी, आपल्या खात्यातर्फे शिक्षणविषयक तज्ज्ञांचे एक अधिवेशन आयोजित केले. त्याला डॉ. हॉवर्ड गार्डनर आणि त्यांच्या तीन सहकाऱ्यांना वक्ते म्हणून आमंत्रित करून मग त्यांची नावे रद्द केली; व त्याची काही कारणेही दिली नाहीत. पुढे अर्थातच त्यांनी दिलगिरीही प्रदर्शित केली. परंतु, खरे कारण असे होतें की, गार्डनर आणि हे इतर तिघे यांनी सरकारच्या हेडस्टार्ट उपक्रमातील चार वर्षांच्या मुलांच्या प्रमाणित चाचण्या घेण्याच्या धोरणाला विरोध केला होता.

यूसीएसच्या अहवालात अशी अनेक उदाहरणे दिली आहे; त्याचप्रमाणे ती अनावृत पत्रामध्येही छापली आहेत. ब्रेस्ट कॅन्सर व गर्भपात यांच्यातील परस्परसंबंध किंवा लैंगिक शिक्षणात संयमावर भर आणि कुटुंबनियोजनाच्या साधनांचा अनुल्लेख अशा कितीतरी धोरणविषयक बाबी आहेत की ज्याबाबतीत सरकारची धोरणे आणि सरकारचे वागणे वादग्रस्त ठरलेले आहे.

जिथे शासनाचे हे असे वागणे पर्यावरणीय किंवा शरीरविज्ञानाच्या क्षेत्रांतील नीतीशी संबंधित असेल तेथे ते आता लोकांच्या अंगवळणी पडले आहे. कारण, अशा व्यापक प्रश्नांबाबत अमेरिका ही पक्षीय राजकारणानुसार दुभंगलेली आहे. परंतु आता प्रश्न तेवढ्यापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. शास्त्रज्ञांमध्ये आता अशी व्यापक भावना पसरली आहे की, जे शास्त्रीय निष्कर्ष किंवा मते ही बुश यांना पसंत नाहीत, त्यांकडे सरळपणे दुर्लक्ष केले जाते.

शास्त्रज्ञांच्या १८ फेब्रुवारीच्या अनावृत पत्राला, जॉर्ज बुश यांचे शास्त्रविषयक सल्लागार जॉन मारबर्गर यांनी अतिशय कडक भाषेत प्रत्युत्तर दिले आहे आणिं बुश सरकारच्या उक्ती-कृतींचे समर्थन केले आहे. त्याची सुरुवातच मुळी, बुश सरकारने शास्त्रीय संशोधनाला कसा सर्वाधिक पैसा उपलब्ध करून दिला आहे, याच्या भलावणीने झाली आहे. या उत्तरात युसीएसचा अहवाल कसा चुकीचा आहे, हे सांगण्यावर जॉन मारबर्गर यांनी भर दिला आहे.

मात्र, युसीएस अहवालानंतरही बुश सरकारची कृती, अहवालात आरोप केल्याप्रमाणेच राहिलेली आहे. कारण, या अहवालाच्या प्रसिद्धीनंतर लगेचच एलिझाबेथ ब्लॅकबर्न या कॅलिफोर्निया विद्यापीठातील पेशीविज्ञानावर काम करणाऱ्या विदुषींना, बायोएथिक्स कौन्सिलच्या अध्यक्षपदावरून तडकाफडकी दूर करण्यात आले आहे. कारण काय तर, गर्भातील पेशी संबंधीचे संशोधन (Embryonic Stem Cell Research) हा विषय वैद्यकीय तंत्रज्ञानामध्ये वादग्रस्त झाला आहे, असे परखड मत त्यांनी मांडले म्हणून ! 'द अमेरिकन सोसायटी फॉर सेल बॉयॉलॉजी' या व्यावसायिक संघटनेने, ब्लॅकबर्नबाईच्या उचलबांगडीविरूद्ध आवाज उठविला आहे. आता सरकारचे पाठधारक आणि इतर वैज्ञानिक यांच्यात हा नवा विषय वादाचा म्हणून पुढे आलेला आहे. ऑगस्ट २००३ मध्ये, वास्तविक 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज कमिटी ऑन गव्हर्नमेंट रिफॉर्म' यांनी, यूसीएस अहवालाप्रमाणेच, काही आरोप सरकारवर केले होते; परंतु या अहवालाची दखल काही डॉ. मारबर्गर यांनी घेतली नव्हती.

अमेरिकन सरकार आज वैज्ञानिकांच्या अविश्वासाच्या तडाख्यात सापडले आहे, हे खरे आहे !

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, १० एप्रिल २००४)* ■■

शैक्षणिक

# जागतिक दर्जाच्या विज्ञान संस्थांची कामगिरी आणि भारत

आंतरराष्ट्रीय पातळीवर, सौंदर्यस्पर्धांविषयक बातम्यांना ठळक स्थान दिले जाते. सौंदर्याला निकष वा क्रमांक लावणे बरोबर नाही; कारण सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या मनात (डोळ्यात) असते, असेही म्हटले जाते. पटो न पटो, पण सौंदर्यापासून ते खेळापर्यंत, ग्राहकोपयोगी वस्तूंपासून ते आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत आणि जाहिरातींपासून ते शिक्षणक्षेत्रापर्यंत सर्वत्र, दर्जा किंवा वर्गवारी व क्रमांक यांचा शिरकाव झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे क्रमांक (Rankings) आणि वर्गवारी (Ratings) या बाबी, आता आपल्या जीवनातील विविध घडामोडींचा एक अविभाज्य घटक झाल्या आहेत. विज्ञानक्षेत्र व वैज्ञानिक हे देखील याला अपवाद ठरलेले नाहीत.

अलीकडेच, विविध विद्यापीठांची जागतिक पातळीवरील क्रमवारी इंटरनेटवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. शांघाय जियाओ टॉग युनिव्हर्सिटीमधील नियान काई लिउ आणि त्यांचे सहकारी यांनी पाच निकषांचा विचार करून विस्तृत अशी शैक्षणिक संस्थांची क्रमवारी तयार केली आहे. त्याचे निकष आहेत: (१) शैक्षणिक वा संशोधन संस्थांमधे शिकविणाऱ्या मंडळींमध्ये पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, औषधशास्त्र किंवा अर्थशास्त्र यांमध्ये नोबेलपुरस्कार मिळविलेले संशोधक असणे (२) विविध अशा २१ विषयांमध्ये उत्कृष्ट संशोधक संस्थेत असणे (३) 'नेचर' व 'सायन्स' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये गेल्या दोन वर्षांत संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले असणे (४) 'एक्सपांडेड सायन्स सायटेशन इंडेक्स'मधील किंवा 'सोशल सायन्स सायटेशन इंडेक्स'मधील लेख (५) संस्थेची एकंदरीत विविध शाखांमधील वर उल्लेखित चार निकषांच्या आधारावरील कामगिरी. ही यादी तयार करणाऱ्यांनी आपल्या कामाच्या पद्धतीची सविस्तर माहिती दिली असून त्याबद्दल आक्षेप घेण्याचे कारण नाही. तरीदेखील कोणतीही क्रमवारी ही कोणा-ना-कोणासाठी वादग्रस्त ठरू शकतेच, असेही त्यांनी म्हणून ठेवले आहे.

यामधून पुढे आलेले निष्कर्ष अपेक्षित असेच आहेत. जागतिक पातळीवर पहिल्या दहा क्रमांकाच्या शैक्षणिक संस्था वा विद्यापीठांमध्ये पहिल्या क्रमांकावर हार्वर्ड, दुसऱ्या क्रमांकावर स्टॅनफोर्ड आणि तिसऱ्या क्रमांकावर कॅलटेक ही तीनही अमेरिकेतील

विद्यापीठे आहेत. चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर बर्कले व केंब्रिज ही विद्यापीठे आहेत. त्यानंतर सहा ते दहा क्रमांक अनुक्रमे एम.आय.टी, प्रिन्स्टन, येल, ऑक्सफोर्ड आणि कोलंबिया या विद्यापीठांना मिळाले आहेत. ही यादी तयार करण्यासाठी जगभरातील मान्यताप्राप्त अशा २००० विद्यापीठांच्या संदर्भात माहिती मिळविण्यात आली होती. आणि त्यातील ५०० विद्यापीठांना एक ते पाचशे क्रमांक देण्यात आले आहेत. जगभरातील या एकत्रित यादीशिवाय अमेरिकेतील, युरोपमधील आणि आशिया-पॅसिफिकमधील उत्कृष्ट विद्यापीठे अशीही वर्गवारी करण्यात आली आहे.

दहा ते वीस क्रमांकामध्ये अमेरिकेच्या सात, ब्रिटनच्या दोन आणि जपानमधील टोकियो विद्यापीठाचा समावेश आहे. टोरांटो विद्यापीठ २३ व्या क्रमांकावर असून इटीएच, झुरीच २५ व्या क्रमांकावर आहे. अमेरिका व ब्रिटनमधील विद्यापीठांनी जगात अग्रक्रम मिळविला आहे. पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये जपानमधील पाच विद्यापीठांचा समावेश आहे. जर्मनीच्या म्युनिच विद्यापीठाचा ४८ वा क्रमांक असून फ्रान्सच्या पॅरिस विद्यापीठाचा ६५ वा क्रमांक आहे.

<u>भारतातील संस्था यात कुठे आहेत</u> ? बंगलोरमधील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' या संस्थेचा क्रमांक २५१ ते ३०० या गटात आहे. आणि ४५१ ते ५०० यांमध्ये दिल्ली व खरगपूर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (आय.आय.टी.) या संस्थांचा समावेश आहे. आशिया-पॅसिफिक गटात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चा क्रमांक २७ ते ३६ या गटात आणि 'आय.आय.टी.'चा क्रमांक ७८ ते ९२ या गटात मोडतो. भारताचा विचार करता या यादीत एक-दोन त्रुटी आहेत, असे वाटते. विविध विद्यापीठांमधील संशोधनकार्यांचे मोजमाप करायचे झाले तर संख्येबरोबर गुणवत्तेचाही विचार करायला हवा, असा निष्कर्ष काढावासा वाटतो. संशोधनाबाबतची विज्ञानसंस्थांची स्थिती, केवळ किती नि कुठे शोधनिबंध प्रकाशित झाले याच निकषावर केवळ पडताळून पाहण्याची प्रवृत्ती कमी करायला हवी. याशिवाय या यादीने काही विशिष्ट संशोधन करणाऱ्या मोठ्या संस्थांचा (भारतात अशा संस्था आहेत) विचार केलेला दिसत नाही.

असे असले तरी, ही यादी तयार करताना जे काही निकष ठरविण्यात आले आहेत, ते योग्य आहेत. त्यात नोबेलशिवाय दुसरे काही महत्त्वाचे पुरस्कार आणि नेचर किंवा सायन्सशिवाय इतर काही नियतकालिकांचा विचार केला असता तरी, या निष्कर्षांमध्ये फारसा बदल झाला नसता. पहिल्या शंभरातील संस्था वगळता इतर काही

देशांच्या संस्थांबद्दल अल्प प्रमाणात का होईना पण शंका उपस्थित केली जाऊ शकेलही, पण एकंदरीत ही यादी योग्य आहे, असे मानले जात आहे.

**भारताने काय करायला हवे ?**

भारताच्या संदर्भात या क्रमवारीतून भारतातील संस्थांनी व धोरणकर्त्यांनी काय बोध घ्यायचा ते खरे महत्त्वाचे आहे. लक्षात घेण्यासारखा एक महत्त्वाचा मुद्दा असा की, भारतात, 'युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशन'ने (यु.जी.सी.) अनेक चांगल्या संस्थांना अभिमत विद्यापीठ (डीम्ड् युनिव्हर्सिटी) असा दर्जा दिलेला आहे. तरीदेखील या संस्थांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधक संस्था म्हणून नाव मिळविलेले नाही. अनेक विद्यापीठांना देण्यात येणाऱ्या निधीत युजीसीने वाढ केली असली तरी या विद्यापीठांनी संशोधनात रस घेतल्याचे दिसत नाही. कधी संशोधनकार्यासाठी विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत; तर कधी प्राध्यापक मंडळी त्यात लक्ष घालताना दिसत नाहीत. अलीकडे, भारतातील कित्येक विद्यापीठे पदवीपूर्व अभ्यासक्रम आयोजित करताना आढळतच नाहीत; हे काम महाविद्यालयांकडे गेलेले दिसते. त्यामुळे युनिव्हर्सिटीचे पदव्युत्तर विभाग हे संशोधनकार्यासाठी सज्ज असायला हवेत. शिष्यवृत्त्या व संशोधन यांची योग्य सांगड घालून संशोधनकार्य पुढे नेणे हे आता गरजेचे ठरायला हवे आहे. गेल्या पन्नास वर्षांपूर्वी अशी स्थिती होती हे विचारात घेतले पाहिजे.

अगदी 'आय.आय.टी.' सारख्या उच्च दर्जाच्या संशोधन संस्थांमध्ये देखील संशोधनाला खूप महत्त्व देण्यात येत नाही. बारावीनंतरच्या संयुक्त प्रवेश परीक्षेतील क्रमवारीनुसार विद्यार्थ्यांना येथे प्रवेश मिळतो व त्यानंतरच्या चार वर्षांमध्ये तांत्रिक ज्ञान मिळाले की पुढे संशोधनाच्या मार्गाकडे फारसे कोणीच फिरकत नाही. त्यामुळे एकंदरीत उच्च शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांनी आपल्या संशोधन कार्याचा व उच्च शिक्षणाचा गांभिर्याने विचार करायला हवा आहे. 'आय.आय.टी' व 'आय.आय.एम.' ('इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट') या संस्थांच्या संदर्भात 'ब्रँड इक्विटी' असा शब्दप्रयोग वापरला जातो आणि विद्यार्थ्यांची इतर क्षेत्रांतील (मोठ्या कंपन्यांमधील) कामगिरी लक्षात घेतली जाते. पण त्यातून या संस्थांचे संशोधनकार्य पुढे येत नाही. शांघाय येथील अभ्यासकांनी शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थांची यादी तयार करून भारतापर्यंत एक विशेष संदेश पोचविला आहे, असे म्हणता येईल. संशोधनाच्या क्षेत्रात, आता तरी भारताला जागे व्हायलाच हवे आहे. *(संदर्भ - करंट सायन्स, २५ मे २००४मधील पी. बालाराम यांचे संपादकीय आणि इंटरनेट )* ■■

दृष्टिक्षेप

# नैसर्गिक संसाधने, भूविज्ञान आणि रोजगार

जागतिकीकरणाच्या पुढील टप्प्यावर, भारतात, उच्च शिक्षण खुले होण्याची शक्यता दृष्टिक्षेपात आली आहे. त्यामुळे जसे परदेशांमधील विद्यापीठांमधून मिळणारे विविध विषयांसंबंधीचे शिक्षण येथील विद्यार्थ्यांना घेता येणार आहे, तसेच भारतातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना स्पर्धेला सामोरे जावे लागेल, अशी लक्षणे आहेत. स्पर्धेत टिकण्यासाठी व दर्जा वाढविण्यासाठी येथील उच्चशिक्षणात कोणकोणते बदल करावेत, याविषयीची चर्चा विविध माध्यमांतून पुढे येत आहे.

या पार्श्वभूमीवर, 'नैसर्गिक संसाधने, भूविज्ञान आणि रोजगार' या विषयावरील तज्ज्ञांची झालेली चर्चा जाणून घेणे उपयुक्त ठरावे. हैदराबाद येथे (नोव्हेंबर २००३) 'इंडियन अॅकेडमी ऑफ सायन्सेस' या संस्थेतर्फे या विषयातील प्राध्यापक मंडळींसाठी एक 'रिफ्रेशर कोर्स' आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी या विषयावर चर्चा झाली. भारतातील भौगोलिक विविधता लक्षात घेता, भूविज्ञान हा एक महत्त्वाचा विषय आहे; मात्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण (एम.एससी) घेणाऱ्यांची संख्या, काळजी करावी इतकी कमी आहे. म्हणजे एखाद -दुसरा विद्यार्थी व दहा -बारा शिक्षक अशी स्थिती आहे. तेव्हा, ही स्थिती सुधारण्यासाठी, या विशिष्ट अभ्यासक्रमाच्या बाबतीत कोणकोणत्या सुधारणा कराव्यात, यावर सर्वंकष चर्चा व्हावी म्हणून भूविज्ञानाशिवाय पर्यावरण, पाणी व्यवस्थापन, अभियांत्रिकी व अर्थशास्त्र या विषयाच्या प्राध्यापकांनाही निमंत्रित करण्यात आले होते. हा अभ्यासक्रम रोजगार मिळण्यासाठी उपयुक्त ठरला पाहिजे, म्हणजे विद्यार्थी त्याकडे आकृष्ट होतील, असा विचार यावेळी पुढे आला.

भूविज्ञान हे महत्त्वाचे शास्त्र आहे; पण बदलत्या काळाचा संदर्भ लक्षात घेऊन ते रोजगाराभिमुख करण्यासाठी, या अभ्यासक्रमात काही बदल सुचविण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, जागतिक पातळीवर, गरिबी दूर करण्याचे विविध कार्यक्रम वा योजना राबविण्यात येत असतात. यांमध्ये पर्यावरण, भूविज्ञान, पाणी व्यवस्थापन अशा अनेक बाबींचा समावेश असतो. पण भारतातील या अभ्यासक्रमात अशा बाबींचा समावेश नाही; तो करण्यात यावा. भूविज्ञानाचा संबंध अनेक विषयांशी आहे. पदार्थविज्ञान,

रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र, भूगर्भविज्ञान, भूपदार्थविज्ञान, हवामानशास्त्र, जमिनीचे व्यवस्थापन इत्यादी अनेक विषय भूविज्ञानाशी संबंध दर्शवितात. या सर्वांचा एकत्रित विचार या शिक्षणात व्हायला हवा. भूविज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन असेही सुचविण्यात आले की याविषयाशी संबंधित किमान तीस ते पन्नास रोजगाराच्या संधींची एक यादी करण्यात यावी. यादी तयार करतेवेळी नवीन तंत्रज्ञान, सामाजिक, पर्यावरणीय व औद्योगिक गरजा इत्यादींचाही विचार करण्यात यावा.

अशा यादीशी संबंधित अनेक लहान-मोठे अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचाही उपयोग विद्यार्थ्यांना होऊ शकेल. रिसोर्स इंजिनियरिंग, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अशाप्रकारचे काही अभ्यासक्रम असले तर ते उपयुक्त ठरणार आहे. डिस्टन्स एज्युकेशन व सायंकालीन अभ्यासक्रम यांनाही चांगला प्रतिसाद मिळू शकतो. म्हैसूर विद्यापीठाने नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचा दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम नव्यानेच चालू केला असून त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. याचा अर्थ या सूचना व्यवहार्य ठरू शकतील असे तज्ज्ञांना वाटते.

भूविज्ञानाच्या अभ्यासक्रमात, त्याच्याशी संबंधित काही विषयांचे विशेष प्राविण्य मिळविण्याची सोय उपलब्ध करून देता येईल का, याचा विचार या टप्प्यावर करणे योग्य ठरेल. भूविज्ञान व त्याच्याशी संबंधित विभाग, जे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, त्यांना इतर विभागांमध्ये सामावून घेऊन त्यांच्या मदतीने काही नवीन रोजगारोपयोगी शिक्षण देण्याचा विचारही करता येईल.

अनेक विद्यापीठांमध्ये भूविज्ञान, भूपदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र असे विविध विभाग आहेत. हे सर्व विभाग वेगवेगळ्या पातळ्यांवर वेगवेगळे कार्य करीत असतात. पण, व्यवहारात त्यांचा फारसा उपयोग होत नसेल तर, या सर्वांचे एकत्रित कार्य आजच्या तरूणपिढीसाठी साहाय्यभूत ठरू शकेल का, हा विचार होणे गरजेचे आहे. त्यामुळे विविध विभागांनी एकत्र येऊन शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याची गरज आज जाणवते आहे. या सर्व विषयांशी संबंधित उद्योगांनी, विविध स्वेच्छाकार्य संस्थांनी आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्र येऊन आपल्या गरजा, अपेक्षा व त्यासंबंधित व्यवस्था यांचा मेळ घातला पाहिजे व उच्च शिक्षणाला रोजगाराभिमुख दिशा दिली पाहिजे.

*(संदर्भ - करंट सायन्स, २५ मार्च २००४ मधील यु. अश्वत्थनारायण यांचा लेख )*

■■



# शांततेच्या पाऊलखुणा

## 'शॉपिंग मॉल'च्या 'शांतते'त रमली मुले !

भारतातील मोठ्या शहरांमध्ये, पाश्चात्य धर्तीची आणि अत्याधुनिक सजावटीची, मोठमोठी दुकाने असलेल्या इमारती (शॉपिंग मॉल्स) उभ्या राहिल्या आहेत. चंगळवाद वाढविणारी आणि चैनीच्या ग्राहकोपयोगी वस्तूंनी खचाखच भरलेली ही शॉपिंग मॉल्स, मुलांवर काय संस्कार करत असतील, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. पण अमेरिकेतील एका प्रसिद्ध शॉपिंग मॉलमध्ये मात्र एक नवीनच उपक्रम राबविला जातोय. 'पीसमेकर्स कॉर्प्स असोसिएशन' (PCA) या स्वेच्छाकार्य संस्थेतर्फे येथे, मुलांना शांततेच्या मार्गावर घेऊन जाणारी दैनंदिन जीवनव्यवहाराची मानवी मूल्ये शिकविली जात आहेत. आपल्या मनातील सहिष्णुता वाढविणे, अन्याय घडवून आणणाऱ्या समाजातील विविध गोष्टींबद्दल जाणीव निर्माण करणे, अशा प्रसंगांसाठी आवश्यक असलेली न्याय्य वागणूक आणि या वागणुकीसाठी आवश्यक असलेले शांत मन, आणि तसे मन तयार करण्यासाठी ध्यानधारणा आणि रागावर नियंत्रण, सहकार, मैत्री, अहिंसा अशी सर्व तत्त्वे शिकविण्याचा कार्यक्रम नियमितपणे घेतला जातोय. भिन्नधर्मीय, भिन्नवंशीय आणि भिन्न कौटुंबिक परिस्थिती असणाऱ्या समाजातील, १२ ते १७ या वयोगटातील मुलांना, येथे एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात येतो. भावी समाज शांततेच्या मार्गावर जाणारा असावा, असे प्रयत्न या उपक्रमाद्वारे करण्यात येत आहेत.

'पीस कॉर्प्स असोसिएशन' ही संस्था कॅरोल क्रेशमन आणि शेल्डन क्रेशमन यांनी सुरू केली. त्यांना प्रेरणा मिळाली ती संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक शांततेसाठी राबविलेल्या योजनांमधून. कॅरोल क्रेशमन यांनी १९९५ ते २००१ या काळात, 'फ्रेंडस् ऑफ द युनायटेड नेशन्स' (FOTUN) या स्वेच्छाकार्य संस्थेच्या अध्यक्षपदी कार्य केले. तेव्हा राष्ट्रसंघाचे अध्यक्ष कोफी अन्नन यांनी १९९७ मध्ये राष्ट्रसंघाच्या एका सभेत, जागतिक शांततेच्या योजनांमध्ये १६ नोव्हेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिवस' पाळण्याचे आवाहन केले होते. शांततेचा व सहिष्णुतेचा हा विचार कॅरोल क्रेशमन यांना, कोफी अन्नन यांच्या इतकाच महत्त्वाचा वाटला. याच काळात त्यांनी,

मुलांमध्ये शांततेची कला शिकविण्यासाठी चार टप्प्यांवर योजना आखली होती. या योजनांच्या अंमलबजावणीसाठी वेगवेगळ्या व्यक्ती, औद्योगिक संस्था व इतर संघटनांची मदत घेण्यात आली होती. यातीलच एक औद्योगिक संस्था होती शॉपिंग मॉल्सच्या क्षेत्रात अग्रगण्य असलेली अमेरिकेतील 'सायमन प्रॉपर्टी कंपनी.' या कंपनीच्या 'सायमन युथ फौंडेशन'ने अमेरिकेतील गृहनिर्माण व शहर विकास खात्याच्या विभागाच्या सहकार्याने या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये मदत केली होती. शांततेचे उपक्रम राबविण्यासाठी या कंपनीच्या शॉपिंग मॉल्समधील जागा उपलब्ध करून देण्यात आली होती.

कॅरोल व शेल्डन क्रेशर्मन यांचा घरगुती उद्योग म्हणजे अशा शॉपिंग मॉल्समध्ये मुलांसाठी विविध प्रकारच्या खेळण्यांचे उदाहरणार्थ, रोलर स्केटिंग, आईस स्केटिंग इ. व्यवस्थापन बघणे असा होता. या उद्योगाच्या निमित्ताने त्यांचा दहा ते सतरा वयोगटातील मुलांबरोबर सतत संवाद होत असे. त्यावेळी त्यांना असे लक्षात आले की, शॉपिंग मॉल्समध्ये येणारी भिन्न भिन्न समाजगटातील मुले शॉपिंग मॉलमधील वातावरणात एकदम मोकळी होतात. बाह्य जगात असलेले भेद, ताणतणाव मॉलमध्ये आल्यावर नसतात. अशा शांत, सुरक्षित आणि समृद्ध ठिकाणी शांततेचे विचार मुलांच्या मनात रुजविणे, फुलविणे हे एक चांगले कार्य ठरू शकेल. ही कल्पना त्यांना सुचली आणि त्या कल्पनापूर्तीच्या दिशेने क्रेशमन यांचे प्रयत्न सुरू झाले.

क्रेशमन यांच्या अथक प्रयत्नांनी ही योजना आकार घेऊ लागली आणि अमेरिकेच्या गृहनिर्माण व शहर विकास खात्यातर्फे १९९९ मध्ये त्यांना १० लाख अमेरिकन डॉलर्स एवढे आर्थिक साहाय्य देण्यात आले. या खात्याच्या सचिव नॅन्सी ग्रॅड्रिग्ज यांनी ही मदत जाहीर करताना म्हटले की, "ही संकल्पना 'पीस कॉर्प्स असोसिएशन'तर्फे मांडण्यात आली तेव्हाच आम्हाला लक्षात आले की, भावी समाज सहिष्णू व शांततेच्या मार्गावर पावले टाकणारा असा तयार व्हावा असे वाटत असेल तर, शांततेचे हे उपक्रम राबविण्याची गरज आहे आणि अशा उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला आम्हाला अभिमानच वाटेल." यानंतर 'पीस कॉर्प्स असोसिएशन'ने संघर्ष मिटविण्यात तज्ज्ञ असणाऱ्या विविध क्षेत्रांतील लोकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. १२ ते १७ वयोगटातील मुला-मुलींसाठी शांततेचा अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी या तज्ज्ञांवर सोपविण्यात आली. त्यात नैतिक मूल्ये, रागाचे व्यवस्थापन, संघर्ष मिटविण्याचे विविध उपाय, ध्यानधारणा, सहिष्णुता आणि

हिंसाचाराला प्रतिबंध असे विषय असावेत, असेही ठरले. हा उपक्रम यशस्वी होऊ लागला आणि अल्पावधीतच 'पीस कॉर्प्स असोसिएशन'ला उद्योगसंस्था, सरकारी यंत्रणा व संस्था, शाळा व समाजातील विविध गट यांच्याकडून पाठिंबा मिळू लागला आणि ११ राज्यांमधील १२ शहरांमध्ये अशा कार्यशाळा घेण्यासाठी निमंत्रितही करण्यात आले. या कार्यक्रमांमधून किमान २५० शांतीदूत तयार करण्याचे ठरविण्यात आले. गावोगावी, स्थानिक समाजातील स्वयंस्फूर्तीने शांतीदूत होऊ इच्छिणाऱ्यांना प्रशिक्षण देऊन, त्यांना तज्ज्ञांच्या बरोबर इतर मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी तयार करण्यात आले. दोन दिवसांच्या प्रशिक्षणात मुलांना जगातील विविधता, त्यातून निर्माण होणारे भेद आणि दहशतवादासारखे प्रश्न, घडलेला हिंसाचार याविषयी माहिती देण्यात येते. मग मुलांना विचार करण्यास प्रवृत्त करण्यात येऊन प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी काय काय करता आले असते, ते चर्चेच्या माध्यमातून जाणून घेण्यात येते. तसेच त्यांना सामाजातील इतर घटकांना शांततेच्या प्रक्रियेत कसे सहभागी करून घ्यायचे तेही संगितले जाते.

शांततेचा अभ्यास करण्याबरोबर हिंसा व आरोग्य यांचा परस्परसंबंध कसा आहे किंवा हिंसेतून प्रश्न सुटत नाहीत तर आणखी प्रश्नच निर्माण होतात, असाही विचार मुलांपर्यंत पोचविण्यात आला. त्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने हिंसाचार व आरोग्य असा एक अहवाल २००२ मध्ये प्रसिद्ध केला आहे. त्यात असे म्हणण्यात आहे की, मनामनांमध्ये हिंसाचार निर्माण होण्यात घरातील व्यक्तिव्यक्तिंमधील हिंसाचार -युक्त वर्तन, कौटुंबिक व सामाजिक असुरक्षा, गरिबी व आर्थिक विषमता, लिंगभेद अशी काही सामाजिक कारणे आणि आत्मसन्मानाचा अभाव अशा काही वैयक्तिक समस्या यांचा सहभाग असतो. एडस् किंवा इतर काही आजारांनी मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या तुलनेत हिंसाचारात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक असावी, असाही अंदाज आहे. असा आंतरराष्ट्रीय संदर्भ लक्षात घेऊन 'पीस कॉर्प्स असोसिएशन'च्या कार्यशाळांमध्ये शांततेच्या योजना कशा कार्यान्वित करायच्या ते शिकविले जाते. त्यामुळे येथे प्रशिक्षण घेतलेल्या मुलांच्या मनात आत्मविश्वास व स्फूर्ती निर्माण होते. येथे प्रशिक्षण घेतलेली मुले कोणत्याही देशातील मुलांशी संपर्क साधू शकतात व तेथील समाजातील प्रश्न सोडविण्यास मदत करू शकतात, असे या कार्यक्रमात सहभागी झालेल्या एका मुलानेच म्हटले आहे. आज, 'पीस कॉर्प्स असोसिएशन'चे कार्य आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त झाले आहे.

*(संदर्भ - इंटरनेट )*

# डॉल्फिनचे पोहणे आणि नावेची बांधणी

माशांचे पोहणे ही झाली एक साधी नैसर्गिक बाब ! पण माशांच्या विविध जाती-प्रजातींनुसार त्यांच्या पोहण्याच्या प्रकारात काही बारीक–सारीक बदल झाले असावेत, असे संशोधकांना वाटले आणि त्यांनी माशांच्या पोहण्याचा अभ्यास करण्याचे ठरविले. डॉल्फिन माशाच्या पोहण्यातील सहजता ही संशोधकांना जास्त कुतुहलाची वाटली. जपानमधील काही संशोधकांनी हा अभ्यास केला तो नावेची किंवा पाणबुडीची रचना त्यांना नैसर्गिक तत्त्वांच्या आधारे आणखी चांगली कशी करता येईल यासाठी.

या अभ्यासात त्यांच्या असे लक्षात आले की, डॉल्फिन माशाची त्वचा ही मऊ व सपाट असते. या त्वचेचा उपयोग त्यांना सहज पोहण्यासाठी होतो. हा उपयोग नेमका कशा प्रकारे होतो, ते शोधण्यासाठी शास्त्रज्ञांनी संगणक प्रतिकृतीचा वापर केला. डॉल्फिन माशाच्या त्वचेच्या विशिष्ट स्वरूपामुळे घर्षण कमी होते, असे त्यांना आढळले. याशिवाय डॉल्फिनच्या शरीराजवळच्या पाण्यात जे छोटे छोटे भोवरे (vortices) तयार होतात, त्यांनादेखील या मऊसर त्वचेचा अडथळा होतो व त्याचा परिणामही घर्षण कमी होण्यात होतो, असे लक्षात आले. ( त्वचा कायमच मऊसर व चांगली राहण्यासाठी निसर्गाने या माशांना वरदान दिले आहे. हे मासे दर दोन तासांनी आपली जुनी झालेली (!) त्वचा टाकून देण्याचे कार्य करीत असतात !) डॉल्फिन माशाच्या संदर्भातील, निसर्गातील या तत्त्वाचा उपयोग, पाणबुडया व नावा आणखी चांगल्या पद्धतीने तयार करण्यासाठी होऊ शकेल, असे संशोधकांना वाटते.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ, १५ जून २००४)* ■■

# संगणक चिप्स, कॅन्सर आणि संशोधकांचा बहिष्कार

आय.बी.एम. ही संगणक क्षेत्रातील मोठी व मान्यताप्राप्त कंपनी. संगणकाशी संबंधित चिप्स व इतर भाग तयार करण्यासाठी ही कंपनी प्रसिद्ध आहे. या कंपनीच्या उत्पादन विभागात काम करणाऱ्यांचा काही विशिष्ट रसायनांशी संबंध येऊन, त्यांना कॅन्सर झाला असल्याचा निष्कर्ष, काही संशोधकांनी अलीकडेच एका अभ्यासावरून

काढला आहे. आणि हा अभ्यास प्रसिद्ध करण्यास नकार देणाऱ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकावर संशोधकांनी बहिष्कार घालण्याचे ठरविले आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठातील डॉ. जो लदो यांनी यासंबंधीचे संशोधन केले असून संगणक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरू शकेल, असे वाटल्याने त्यांनी 'एल्सवियर' या प्रकाशनसंस्थेच्या 'क्लिनिक्स इन ऑक्युपेशनल अँड एन्व्हायर्नमेंटल मेडिसिन' या नियतकालिकाकडे (इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील आरोग्यावर लक्ष देण्याचे या नियतकालिकाने ठरविले होते.) ते प्रसिद्धीसाठी पाठविले. हे संशोधन प्रसिद्ध करण्यास या मासिकाने लगेचच नकार देऊन तसे ई-मेलने त्यांना कळविले. याघटनेनंतर या नियतकालिकाकडे लेख पाठविणाऱ्या अनेकांनी आपला पाठिंबा डॉ. जो लदो यांना दिला व बहिष्कार घालण्याची तयारी दर्शविली. या नियतकालिकाच्या संबंधित अंकासाठी पाठविण्यात आलेले सर्व लेख मागे घेण्याचा निर्णय संशोधकांनी एकत्रितरित्या घेतला आहे. संगणक क्षेत्रातील कंपनीच्या दबावाखाली येऊन आपले संशोधन नाकारण्यात आले, असे डॉ. जो लदो यांनी म्हटले आहे. पण आय.बी.एम. कंपनीने आपण असा दबाव आणलेला नाही, असे स्पष्ट करून हे संशोधन सदोष असल्याचे म्हटले आहे.

गेल्या काही वर्षांपासून आय.बी.एम. व तत्सम मोठ्या कंपन्यांसाठी कर्मचाऱ्यांचे आरोग्य ही एक डोकेदुखी ठरते आहे. या कंपन्यांमधील माजी कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्यासाठी या कंपन्यांना जबाबदार ठरविले असून अशा २५० पेक्षा जास्त तक्रारींना आय.बी.एम.ला तोंड द्यावे लागत आहे. नॅन्सी या कर्मचारी महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, नोकरीच्या कालावधीत आपल्याला विविध रसायनांच्या धुरात वावरावे लागले व त्यानंतर जन्म झालेल्या तिच्या मुलीला आरोग्यविषयक अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. या मुलीच्या मेंदूचा काही भाग कवटीमधून बाहेर आलेला दिसतो. हिथर कर्टिस या कर्मचारी महिलेच्या मुलीलाही मेंदूविषयक समस्या आहेत. सुझान रुबिओ या कर्मचारी महिलेला नोकरीच्या काळात कॅन्सर झाला व अलीकडे, केवळ ३६ व्या वर्षी तिचे निधन झाले. हिथर कर्टिस या महिलेची तक्रार, कंपनीने न्यायालयाबाहेर, मोठी नुकसानभरपाई देऊन मिटविल्याची चर्चा आहे. ॲलिडा हर्नांडेज (वय ७३) आणि जेम्स मूर (वय ६२) यांनीही कॅन्सर झाल्याबद्दल कंपनीला दोषी ठरविले आहे. यासंबंधी न्यायालयाकडून चौकशीचे आदेश आल्यानंतर केलेल्या चौकशीत, कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये कॅन्सरने मरणाऱ्यांची संख्या अधिक आढळली आहे.

*(संदर्भ - गार्डियन न्यूजपेपर्स लिमिटेड, द हिंदू)* ■■

# अपुरी स्वच्छता आणि बालमृत्यू


स्वच्छता व चांगले आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. आरोग्यविषयक सोयी अपुऱ्या आणि निकृष्ट दर्जाच्या असणे आणि बालमृत्यूंचे प्रमाण जास्त असणे यांचाही थेट संबंध आहे. उदाहरणार्थ, अफगाणिस्तानमध्ये ८७ ते ८८ टक्के नागरिकांना स्वच्छताविषयक सोयी आणि पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध होत नाहीत. तेथे दरवर्षी अंदाजे ४८हजार बालके मृत्युमुखी पडतात, असे आढळले आहे. भारतात, दरवर्षी सुमारे ५,१९,५०० बालके अस्वच्छतेमुळे होणाऱ्या विविध रोगांनी मृत्युमुखी पडतात. भारतात, पाच वर्षाखालील बालकांच्या मृत्युचे प्रमाण, दर हजारी ९३ आहे. अनेक देशांमध्ये, आजही, स्वच्छता व आरोग्य यांचा संबंध दुर्लक्षितच आहे. खालील तक्त्यात काही देशांमधील, यासंबंधीची उपलब्ध झालेली आकडेवारी दिली आहे.

| देश | पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नसणाऱ्या नागरिकांची टक्केवारी | स्वच्छताविषयक पुरेशा सोयी नसणाऱ्या नागरिकांची टक्केवारी | पाच वर्षाखालील बालमृत्यूचा दर (एक हजार - जन्मामागे) |
|---|---|---|---|
| अफगाणिस्तान | ८७ | ८८ | २५७ |
| बांगलादेश | ३ | ५२ | ७७ |
| कंबोडिया | ७० | ८३ | १९७ |
| इथिओपिया | ७६ | ८८ | १७२ |
| भारत | १६ | ७२ | ९३ |
| केनिया | ४३ | १३ | १२२ |
| लाओस | ६३ | ७० | १०० |
| दक्षिण आफ्रिका | १४ | १३ | ७१ |
| झांबिया | ३६ | २२ | २०२ |
| सियारा लिओन | ४३ | ३४ | ३१६ |

*(संदर्भ -वॉटर सप्लाय अँड सॅनिटेशन कोलॅबोरेटिव्ह कौन्सिल, स्वित्झर्लंड)* ■■

## दरमहा 'पॉकेट मनी' मिळणाऱ्या मुलांची टक्केवारी


जग जसजसे जवळ येत आहे तसतशी विविध संस्कृतींमधील आचारविचारांची देवाणघेवाण होत आहे. मुलांना दरमहा खाऊ, खेळ वा तत्सम छोट्या खर्चासाठी काही रक्कम दरमहा देणे ('पॉकेटमनी'), ही पाश्चात्य संस्कृतीची समजली जाणारी बाब, आता भारतातील शहरी संस्कृतीत स्थिरावू पाहात आहे. साधारणपणे सात ते चौदा वयोगटातील मुलांना असा 'पॉकेटमनी' मिळतो. 'पॉकेटमनी' मिळणाऱ्या या वयोगटातील मुलांची संख्या, महानगरांचा विचार करता दिल्लीत सर्वाधिक (६७ टक्के) आहे; तर मोठ्या शहरांच्या गटात लुधियानातील मुलांची टक्केवारी (६८ टक्के) जास्त आहे. मुंबईतील सात ते चौदा याच वयोगटातील ५७ टक्के मुलांना 'पॉकेटमनी' मिळतो, असे आढळले आहे.




*(संदर्भ - कार्टून नेटवर्क -टी.एन.एस. सर्व्हे २००२, इकॉनॉमिक टाइम्स)*

# आफ्रिका व आशियात मोबाईल फोनला मागणी

जगात, दक्षिणेकडील राष्ट्रांमध्ये मोबाईल फोनधारकांची संख्या वाढते आहे. विविध खंडांतील, १९९५ ते २००२ या काळातील, मोबाईल फोनधारकांच्या वार्षिक वाढीची सरासरी टक्केवारी आलेखात दिली आहे. अमेरिका किंवा जपान अशा काही देशांच्या तुलनेने, आफ्रिकेत मोबाईल फोनधारकांची संख्या कमी असली तरी अलीकडे त्यांची संख्या द्रुतगतीने वाढत असल्याचे या आलेखावरून समजून येते.




*(संदर्भ - वर्ल्ड टेलिकम्युनिकेशन्स डेव्हलपमेंट रिपोर्ट २००३, डाऊन टू अर्थ)* ■■

## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# विश्वकुटुंबाच्या दिशेने....

मित्रांनो, आम्हाला संप्रदाय, जातीवाद, प्रदेश आणि प्रांत, क्षेत्र या साऱ्या सीमा उल्लंघून जावयाचे आहे. पहिले पाऊल म्हणून आम्ही कमीत कमी भारतवर्षात तरी एक अखिल भारतीय मानस तयार केले पाहिजे, जे विश्वकुटुंबाच्या दिशेने पहिले पाऊल ठरेल. या अखिल भारतीयतेत, भारतात राहणाऱ्या सर्वांच्या एकात्मतेवरच अधिक भर देण्यात येईल, राष्ट्रांच्या वेगळेपणावर नव्हे. फक्त आपल्या राष्ट्रालाच महान मानण्याची गोष्ट नकारात्मक असते. मानवीय मूल्यांची प्रस्थापना करण्यासाठी भावरूप मानसिकता आली पाहिजे. ही मानसिकता तेव्हाच उत्पन्न होते जेव्हा दुसऱ्या देशाशी लढाई उद्‌भवते - ती जोडणारी भावना नसते. जसे हिंदूंची अस्मिता तेव्हाच प्रकटते, जेव्हा मुसलमानांशी दंगे होतात. दंगा समाप्त झाला की त्याचे तीन तेरा वाजतात. तू - तू - मैं - मैं चालू होते. जे संकटाशिवाय एकत्र होऊ शकत नाहीत, त्यांच्यात जोडण्याची शक्ती निर्माण होऊ शकत नाही.

जेव्हा चित्ररथ गंधर्व दुर्योधनाला घेऊन आला, तेव्हा धर्मराजाने सांगितले की, दुर्योधनाला धरून आम्ही एकशेपाच आहोत. परंतु जेव्हा गंधर्व निघून गेला, तेव्हा पुन्हा शंभर वेगळे व पाच वेगळे झाले. संकटकाळी एकत्र येणाऱ्या लोकांमध्ये भावरूप एकता प्रकट होऊ शकत नाही. आता आम्ही असे प्रयत्न केले पाहिजेत की केवळ संकटकाळातच नव्हे, तर शांतीच्या काळातही ही आमची भावरूप एकता प्रकट झाली पाहिजे. एकतेचा हा भाव गतीशील व सक्रीय शांतीच्या रूपात प्रकट झाला पाहिजे. अशा शांतीची प्रस्थापना जर आपल्याला या देशात करावयाची असेल तर संप्रदायवाद, जातीवाद, क्षेत्रवाद, भाषावाद आणि आता तर लिपीवाद सुद्धा, सर्वांचे निराकरण झाले पाहिजे. तरच विश्वकुटुंबाच्या दिशेने प्रगती करू शकू, त्या दिशेने वाटचाल करू शकू.

(संदर्भ - नागरिक विश्वविद्यालय : एक परिकल्पना - दादा धर्माधिकारी ) ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●के. एन्. राज ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छांपून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**